बुधवार, २६ ऑक्टोबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ९९
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड






मुरूड : समुद्रकिनारी मावळतीच्या क्षणी ग्रहण लागलेला सूर्य सुटकेच्या दिशेने आणि कलता दिवस अस्ताच्या दिशेने चाललेला असताना एक अनोखा संगम मंगळवारी पर्यटकांनी अनुभवला.
(छाया : सुधीर नाझरे)

## माथेरानमध्ये लवकरच सुरू होणार चाकावरचे उपहारगृह

### मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रवासी, पर्यटकांना रेल्वेच्या डब्यात निवांतपणे बसून खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता यावा यासाठी सीएसएमटी आणि नागपूर स्थानक हद्दीत 'चाकावरचे उपहारगृह' सुरू करण्यात आले असून प्रवासी, पर्यटकांकडून मिळणारा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन मध्य रेल्वेने माथेरानमध्येही चाकावरचे उपहारगृह सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी जागेची पाहणी आणि अन्य कामे प्राथमिक स्तरावर सुरू असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

माथेरानमध्ये मोठ्या संख्येने येणारे पर्यटक मिनी ट्रेनमधून प्रवास करण्याचा आनंद घेतात. चाकावरचे उपहारगृह उपलब्ध झाल्यास त्यालाही पर्यटकांकडून चांगला प्रतिसाद मिळेल, असे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले आहे.

आतापर्यंत सीएसएमटीमधील या उपहारगृहात सव्वालाख, तर नागपूरमधील उपहारगृहात दीड लाख नागरिकांनी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला आहे. आता चाकावरच्या उपहारगृहासाठी पर्यटस्थळ असलेल्या माथेरानची निवड करण्यात आली आहे. माथेरानमध्ये या उपहारगृहासाठी जागेचा शोध सुरू आहे.

# नक्षलवाद संपवणार : मुख्यमंत्री शिंदे

## गडचिरोलीतील दुर्गम भागात साजरी केली दिवाळी



**गडचिरोली : प्रतिनिधी**

गडचिरोली पोलीस हे आपल्या कुटुंबापासून, घरापासून दूर राहून संवेदनशील भागात नक्षलविरोधात कर्तव्य बजावतात. नक्षलग्रस्त भागात जाऊन त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या सोबत दिवाळी साजरी करणे हा सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे. या ठिकाणी नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी पोलीस दल सक्षम आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

गडचिरोलीतील भामरागड तालुक्यातील धोडराज येथे पोलीस मदतकेंद्राच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन व जनजागरण मेळाव्याप्रसंगी तसेच आदिवासी बांधव आणि पोलीस जवानांसोबत दिवाळी साजरी करताना मंगळवारी (दि. २५) ते बोलत होते. या वेळी पोलीस महासंचालक रजनीश सेठ, जिल्हाधिकारी संजय मीणा, पोलीस उपमहानिरीक्षक संदीप पाटील, पोलीस अधीक्षक निलोत्पल आदी उपस्थित होते.

धोडराज येथील अतिदुर्गम व अतिसंवेदनशील भागातील पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन झाले. या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, यापूर्वी पालकमंत्री असतानासुद्धा अनेक ठिकाणी दुर्गम भागात आपण भेटी दिल्या. विकासाचे काम आता गडचिरोलीत मोठ्या प्रमाणात होत असून रस्ते, पाणी, शिक्षण, वैद्यकीय सुविधा आदी मूलभूत सुविधांची निर्मिती करून हा भाग मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध आहे.

गत दोन वर्षांत सर्व व्यवहार ठप्प झाले होते. **(पान २ वर..)**

## समृद्धी महामार्ग नोव्हेंबरमध्ये शिर्डीपर्यंत खुला

**नागपूर** : मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गाचे काम आता पूर्ण होत आले आहे, पण हा महामार्ग कधी सुरू होणार याची प्रतीक्षा अवघ्या महाराष्ट्राच्या जनतेला लागली आहे. पुढील नोव्हेंबर महिन्यात समृद्धी महामार्ग हा शिर्डीपर्यंत खुला होणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. समृद्धी महामार्ग आपण लवकरच मोकळा करणार आहोत. शिर्डीपर्यंत प्रवासाला परवानगी दिली जाणार आहे. त्यानंतर शिर्डी ते नागपूर दुसऱ्या टप्प्यात मोकळा केली जाईल. नोव्हेंबर महिन्यातच शिर्डीपर्यंत प्रवासासाठी मोकळा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासह मुंबादेवी मंदिराचा करणार कायापालट

**मुंबई : प्रतिनिधी**



**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती**

उज्जैन येथील मंदिराच्या धर्तीवर पंढरपुरातील विठ्ठल-रखुमाई मंदिरासह मुंबईतील मुंबादेवी मंदिराचा कायापालट करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २५) केली. दिवाळीनिमित्त पत्रकारांशी अनपौचारिक गप्पा मारताना ते बोलत होते.

फडणवीस पुढे म्हणाले की, आमचा पायाभूत सुविधांवर भर आहे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने विविध देवदेवतांची मंदिरे आहेत. त्यामुळेच उज्जैन येथील मंदिरांच्या धर्तीवर आम्ही मुंबईतील मुंबादेवी व पंढरपुरातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराचा लवकरच कायापालट करणार आहोत. या ठिकाणी मंदिर परिसरात कॉरिडॉर उभारणार आहोत. याबाबत मुख्यमंत्री लवकरच निर्णय घेतील, असेही फडणवीसांनी म्हटले आहे.

## राज्यातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शैक्षिणक, सामाजिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने २२वी राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली असून संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेल्या या दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कृतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे सुरू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निर्मिती व्हावी, यासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गेल्या २१ वर्षांपासून महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा ही २२वी स्पर्धा आहे.

यंदाही बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, **(पान २ वर...)**



**कळंबोली : अथर्व क्रिएशन हरीश मोकल प्रस्तुत स्वर अमृताचे या कार्यक्रमाला मंगळवारी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, अमर पाटील, बबन मुकादम, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, माजी जि. प. सदस्य प्रिया मुकादम, भाजप कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी सरपंच शशिकांत शेळके, कामगार नेते रवींद्र नाईक, कळंबोली उपाध्यक्ष विनोद बोरसे, देविदास खेडकर, भाजपचे रवींद्र पाटील, राम धरणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात इंडियन आयडॉल सागर म्हात्रे यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.**

**राम प्रहर**

### गुरुवारचा अंक नाही

दिवाळी पाडव्यानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास बुधवारी सुटी असल्यामुळे गुरुवार (दि. २७)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**

**–मुख्य संपादक**







## वरळी-शिवडी उन्नत रस्ता प्रकल्प

# बाधित प्रकल्पग्रस्तांचे लवकरच पुनर्वसन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई पारबंदर प्रकल्पांतर्गत (शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू) वरळी-शिवडी उन्नत रस्त्याचे बांधकाम हाती घेतले आहे. या प्रकल्पात प्रभादेवीमधील १९ इमारती बाधित होत असून या इमारतींमधील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी एमएमआरडीएने २०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. प्राधिकरणाच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीत या तरतुदीला मान्यता देण्यात आली. त्यामुळे आता या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे.




दक्षिण मुंबईतून शिवडी-न्हावाशेवा सागरीसेतूवर जलद गतीने पोहोचता यावे यासाठी ४.५ किमी लांबीचा आणि कुठेही सिग्नल यंत्रणा नसलेल्या शिवडी-उन्नत रस्ता प्रकल्पाचे काम एमएमआरडीएने हाती घेतले आहे. या प्रकल्पामुळे ७००हून अधिक झोपड्या बाधित झाल्या असून त्या हटविण्यात आल्या आहेत. या झोपडपट्टीवासीयांचे 'झोपु' योजनेंतर्गत पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर प्रभादेवी येथील १९ इमारतीही बाधित होत आहेत. बाधितांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेची असून यासाठी ४०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पुनर्वसनासाठी लागणारी संपूर्ण रक्कम खर्च करण्यास मुंबई महानगरपालिकेने नकार दिला होता, तसेच यापैकी ५० टक्के खर्च एमएमआरडीएने करावा अशी मागणी मुंबई महानगरपालिकेने केली होती.

महत्त्वाकांक्षी वरळी-शिवडी उन्नत रस्ता प्रकल्प मार्गी लागणे गरजेचे असल्याने एमएमआरडीएने खर्चाचा ५० टक्के भार उचलण्यास होकार दिल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. एमएमआरडीएने बाधितांच्या पुनर्वसनाच्या खर्चासाठी २०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आल्याची माहिती या अधिकाऱ्याने दिली. आता उर्वरित २०० कोटी रुपये निधी मुंबई महानगरपालिकेने उपलब्ध करणे आवश्यक आहे. दरम्यान, आता या १९ इमारतीमधील बांधितांचे पुनर्वसन नेमके कसे करायचा याचा निर्णय एका समितीच्या माध्यमातून लवकरच घेण्यात येणार आहे.

# आशा स्वयंसेविकांना भाऊबीजेची भेट

**ठाणे : प्रतिनिधी**

आरोग्य क्षेत्रात आशा स्वयंसेविकांचे असलेले योगदान लक्षात घेऊन, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना पाच हजारांचे सानुग्रह अनुदान देण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिका प्रशासनाला दिले होते. त्यानुसार महापालिका प्रशासनाने सर्व प्रक्रिया पूर्ण करून मंगळवारी (दि. २५) ३४० आशा स्वयंसेविकांच्या बँक खात्यात पैसे जमा केले. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आशा स्वयंसेविकांना भाऊबीजेची भेट दिल्याचे बोलले जात आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील

### खात्यात सानुग्रह अनुदान जमा

आशा स्वयंसेविकांच्या शिष्टमंडळाने माजी महापौर नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. शिष्टमंडळाने सानुग्रह अनुदानासह काही मागण्या मांडल्या होत्या. त्यावर, मुख्यमंत्री शिंदे यांनी तत्काळ भाऊबीजेची भेट म्हणून पाच हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहीर केले होते. तसेच हे अनुदान तत्काळ देण्याचे आदेशही त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले होते. त्यानुसार महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तशा सुचना देऊन आशा स्वयंसेविकांना अनुदान देण्याची प्रक्रीया सुरु केली होती.

दरम्यान, मंगळवारी या सर्व सेविकांना अनुदानाची रक्कम देण्यात आली. आशा स्वयंसेविकांना प्रथमच सानुग्रह अनुदान मिळाले आहे. ३५४ पैकी १४ आशा स्वयंसेविकांना धनादेशाने सानुग्रह अनुदान देण्यात आले, तर उर्वरित ३४० आशा स्वयंसेविकांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले आहेत. ही सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली ही समाधानाची गोष्ट असल्याचे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले.

## पुण्यात फटाक्यांमुळे १७ ठिकाणी आगीच्या घटना

**पुणे : प्रतिनिधी**

दिवाळीचा (लक्ष्मीपूजन) सण सोमवारी सर्वांनीच मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा केला, मात्र पुणे शहरात फटाक्यांमुळे १७ ठिकाणी आगीच्या घटना घडल्या, तर औंध येथे चार बीएचकेचा फ्लॅट जळून खाक झाल्याची घटना घडली आहे.



अग्निशामक विभागाच्या अधिकार्यांनी दिलेल्या माहितीनुसार, काल सायंकाळी ७ ते रात्री १२ पर्यंत फाटक्यामुळे १७ आगीच्या घटना घडल्या. त्याचदरम्यान औंध येथील डीपी रोडवरील इंडियन बँके जवळील १२ मजली टेरेजा सोसायटीमधील पहिल्या मजल्यावर असलेल्या घरामध्ये आग लागली असल्याची माहिती १०.३० वाजण्याच्या सुमारास आम्हाला मिळाली. त्यानंतर आमची टीम काही मिनिटात घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले, मात्र तोपर्यंत चार बीएचकेच्या फ्लॅट पूर्णपणे जळून खाक झाला. या आगीवर नियंत्रण मिळविल्यानंतर टेरेसवर असलेल्या नागरिकांना खाली काढण्यात आले. संबंधित फ्लॅट धारकाकडे चौकशी केली असता घरांमध्ये बाहेरून फटका आल्याने आग लागल्याचे त्यांनी सांगितले.



**नवी मुंबई : बँक ऑफ इंडिया प्रबंधन विकास संस्था येथे १४ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर या काळात हिंदी महिना साजरा करण्याकत आला. संस्थानाचे प्राचार्य राजीव सिन्हा व कर्मचाऱ्यांनी गृहमंत्री अमित शाह तथा बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ए. के. दास यांच्या संदेशांचे वाचन केले. कार्यालयीन कामकाजात जास्ती त जास्त हिंदी भाषेचा वापर करण्याची प्रतिज्ञा राजीव सिन्हा व सर्व कर्मचाऱ्यांनी घेतली. या वेळी उपप्राचार्य विजय कुमार जैसवाल, मुख्य व्यवस्थापक राजभाषा रमेश साखरे व कर्मचारी उपस्थित होते.**

## सामाजिक बांधिलकीतून अन्नदान, शैक्षणिक साहित्य वाटप

**उरण : बातमीदार**

जवाहर कोळी (बामणडोंगरी) आणि अक्षय ठाकूर (केळवणे) यांच्याकडून राजिप शाळा कडापे आणि पुनाडेवाडी येथील इ. १ली ते ५वीच्या सर्व मुलांसाठी स्नेहभोजन, दिवाळी स्वीट, शालेय गणवेश, शैक्षणिक साहित्याचे वाटप सोमवारी (दि. २४) करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत सामाजिक भावनिक विकास व्हावा, आपण ज्या समाजामध्ये राहतो, त्या समाजातील वंचित घटकासाठी आपण काहीतरी केले पाहिजे ही भावना मुलांमध्ये रुजावी यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

या उपक्रमासाठी कडापे शाळेचे मुख्याध्यापक हितेंद्र म्हात्रे, पुनाडेवाडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप पाटील, कडापे शाळेचे उपशिक्षक रमेश पाटील त्याप्रमाणे शाळा कमिटीचे सदस्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी कडापे शाळेतील उपशिक्षक रमेश पाटील यांनी सर्वांचे स्वागत करून जवाहर कोळी आणि अक्षय ठाकूर त्याचप्रमाणे सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



## मोरा मत्स्यव्यवसायिक सहकारी सोसायटीची स्थापना



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील उरण मच्छिमार कोळी बांधवांच्या विविध अडचणी व समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून मोरा मत्स्य व्यावसायिक विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्यादितची स्थापना करण्यात आली आहे.

या मच्छिमार सोसायटीच्या चेअरमनपदी राकेश कोळी, व्हाईस चेअरमनपदी कल्पना मोरेकर तर सेक्रेटरीपदी नारायण कोळी यांची निवड करण्यात आली आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेचे रवींद्र पाटील यांनी सर्व सभासदांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या संस्थेमध्ये एकूण सभासद ३० आहेत

राकेश कोळी, नारायण कोळी, कल्पना मोरेकर, नंदादीप कोळी, गजेंद्र कोळी, प्रशांत कोळी, हेमंत कोळी, सुहास कोळी, सुनील कोळी, आरती कोळी, पूजा कोळी, जयेश कोळी, मयुर पांचाळ असे कार्यकारी समिती सभासद या संस्थेमध्ये आहेत.

## अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेच्या कार्यकारिणीची निवड

**उरण : वार्ताहर**

अलिबागमध्ये अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेच्या कार्यकारिणीची निवड रविवारी (दि. २३) करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षपदी कैलास पिंगळे यांची निवड झाली आहे. या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणुन कामगार नेते अनंत गोंधळी असून त्यांनी संस्थेला भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



या वेळी मिलिंद खारपाटील, सुरेश भोपी, जीविता पाटील, संध्या दिवकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तर, डॉ. अविनाश पाटील, म. वा. म्हात्रे, चंद्रकांत पाटील यांना साहित्य शिरोमणी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

गायक एकनाथ माळी व स्मिता वाजेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. अरुण म्हात्रे यांनी ईशस्तवन सादर केले. जगदीश थळे, दिलीप मोकल, संध्या ठाकूर, स्मिता पाटील, अरुण घासे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात ५० प्रतिभावंतांनी काव्य संमेलनात सहभाग नोंदवला. अरुण म्हात्रे, मारुती बागडे, भ. पो. म्हात्रे, रामलाल पाटील, नम्रता पाटील, नयना पासवान, जयंत कृष्णा पाटील, स्मिता पाटील, संध्या ठाकूर, किमया पिंगळे, नरेश म्हात्रे, शरद पाटील, एन. जे. पाटील, शिवाजी मोकल, अरुण घासे, दिलीप मोकल, संध्या दिवकर, राजाराम भगत, एकनाथ माळी, स्मिता वाजेकर आदींनी आपल्या कवितेला उत्स्फूर्त दाद मिळवली. जीविता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे सचिव महादेव म्हात्रे यांनी आभार मानले.

## स्वयंभू गणपती बालाजी मंदिरात दिवाळी पहाट

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री स्वयंभू गणपती बालाजी मंदिर, नवीन पनवेल येथे दिवाळी पहाट या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवीन पनवेल ब्राह्मण सभेच्या गायक कलाकारांनी या कार्यक्रमात गायनसेवा केली. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, ब्राह्मण सभा अध्यक्ष दिपाली जोशी, सचिव मंजुषा भावे आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व कलाकारांचे कौतुक करताना ब्राह्मण सभेची पुढील पिढी कलाक्षेत्रात चांगला नावलौकिक प्राप्त करेल असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी शार्दुल लुंपाटकी, मधुरा व मल्हार भिडे, अद्वैत कुरुंदकर या लहान मुलांनी मंत्रपठण केले. त्यानंतर श्रीनिवास काजरेकर, प्रसाद जोशी, मृदुला गोविलकर, तन्वी मिनासे, समृद्धी देवरुखकर आदी गायक कलाकारांनी अभंग, नाट्यगीत, भक्तिगीत, जोगवा, गवळण आदी विविध प्रकारची गाणी सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. प्रतिभा कुलकर्णी यांनी संवादिनी तर मयुरेश साठे व हर्षद कार्ले यानी तबला व तालवाद्याची साथ केली.

संस्थेचे विश्वस्त माधुरी श्रीनिवासन् व ब्राह्मण सभेचे पदाधिकारी चंद्रकांत ताह्मनकर, मिलिन्द गांगल, शेखर अंबेकर यांनी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले.



पान १ वरून

## नक्षलवाद संपवणार : मुख्यमंत्री शिंदे

तसेच कोरोनामुळे अनेक प्रकारचे निर्बंध होते. आता अनेक सण नागरिक मनमोकळेपणाने साजरे करीत आहेत. हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. पोलीस महत्त्वाचा घटक असून पोलिसांच्या पाठीमागे महाराष्ट्र शासन भक्कमपणे उभे आहे, तसेच आदिवासी समाजाचा जीवनस्तर उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. गडचिरोलीत विविध योजना, नवीन उद्योग, लोकांच्या हाताला काम याबाबत सरकारने नियोजन केले आहे. पूर्वीचा गडचिरोली आणि आत्ताचा गडचिरोली यात अमुलाग्र बदल झालेला दिसत आहे, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

या वेळी पोलीस महासंचालक रजनीश सेठ म्हणाले की, महाराष्ट्र - छत्तीसगड सीमेवर येऊन जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी माननीय मुख्यमंत्री यांनी येथे दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला ही बाब संपूर्ण पोलीस जवानांसाठी अतिशय आनंदाची आहे. सरकारच्या पाठिंबामुळेच गडचिरोली पोलीस उत्कृष्ट काम करीत असून राज्य व केंद्र सरकारच्या सर्व योजना लोकांपर्यंत पोहचविण्यात मदत होत आहे.

प्रास्ताविक पोलीस उपमहानिरीक्षक संदीप पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वीर बिरसा मुंडा आणि वीर बाबुराव शेडमाके यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. तत्पूर्वी धोडराज येथील पोलीस मदत केंद्राच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते फित कापून उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी त्यांनी प्रशासकीय इमारतीची पाहणी केली. कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते इरपे दोगे पल्लो, माळी गुमा मासा, शांती कुतु मज्जू, चैते चैतू पल्लो यांना साडीवाटप, राजे चैतु पुंगाटी, जैनी वड्डे, इंदरसाय गावडे यांना ब्लँकेट वाटप, रेश्मा सैनू मिच्छा हिला शिलाई मशीन, परी दिनेश पुंगाटी, मोहन वड्डे या बालकांना स्कूल बॅग तर बबलू देवाजी सिडाम, सोमजी विना पुंगाटी यांना फवारणी संच वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विनीत पद्मावार यांनी तर आभार पोलीस अधीक्षक निलोत्पाल यांनी मानले. यानंतर मुख्यमंत्र्यांनी पोलीस जवान तसेच त्यांच्या कुटुंबियांसोबत दिवाळी साजरी केली.

## राज्यातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

द्वितीय क्रमाकांस ५० हजार तर तृतीय क्रमांकास ३० हजार रुपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कृष्ट कथेसाठी सात हजार रूपये, उत्कृष्ट कविता, उत्कृष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ट विशेषांक व उत्कृष्ट मुखपृष्ठ यांना प्रत्येकी पाच हजार रुपये, त्याचबरोबर बालसाहित्याच्या सर्वोत्कृष्ट अंकास ७५०० रुपये तसेच रायगड जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास २० हजार रुपये आणि ततीय क्रमाकांस १० हजार रुपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी पाच हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रुपये प्रवेश फीसह २० नोव्हेंबरपर्यंत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्र. ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

## रयत सेवक सहकारी बँकेच्या संचालकपदी प्रा. किशोर पाटील

**कळंबोली : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या अर्थवाहिनी असणाऱ्या द रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालकपदी किशोर सुरेश पाटील यांची निवड झाली आहे. त्यांचे शैक्षणिक सामाजिक राजकीय क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे. किशोर पाटील हे नवी मुंबईतील वाशी कार्यक्षेत्राचे प्रतिनिधित्व करणार असून सद्यस्थितीत ते नावडा येथील प. जो. म्हात्रे कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत.



सातारा येथील रयत शिक्षण संस्थेमध्ये सेवकांची बँक असलेली १० हजार ५०० वर सभासद संख्याआहे. एक हजार ३०० कोटीच्या ठेवी असून २१ शाखांचा विस्तार राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये आहे. कार्यरत असणाऱ्या पगारदार नोकरांची महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील एक नामांकित बँक अशी ओळख आहे. बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत रयत सेवक संघ सातारा पॅनलच्या वतीने प्रा. किशोर पाटील यांनी निवडणूक लढवली व या निवडणूक त्यांनी घवघवीत विजय मिळवला.

या विजयाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार रामशेठ ठाकूर, रायगड विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर, सहाय्यक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, रयत सेवक संघाचे राज्य समन्वयक नुरा शेख, संस्थेचे आजीव सदस्य प्रमोद कोळी, आजीव सदस्य रवींद्र भोईर आदींनी अभिनंदन केले आहे.

**दुखवटा**




### गोपीनाथ कोशे

**उरण :** उरण शहरातील वाणीआळी येथे राहणारे कुशल कारागीर गोपीनाथ बाबू कोशे (वय ९७) यांचे रविवारी (दि. २३) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन सुना, दोन मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. कै. गोपीनाथ कोशे यांचे दहावे मंगळवारी (दि. १ नोव्हेंबर) श्री क्षेत्र माणकेश्वर येथे होणार असून तेरावे शुक्रवारी (दि. ४ नोव्हेंबर) वाणी आळी येथे होणार आहे.

# दिवाळी अंक हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण अंग -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी साहित्य परंपरेला अनुसरून दिवाळी अंकाची निर्मिती होत असते, आणि त्यातून नवनवीन साहित्य वाचकांपर्यंत पोहचत असते, त्यामुळे दिवाळी अंकांना साहित्य परंपरेत अनन्य साधारण महत्त्व असून दिवाळी अंक हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे, असे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.



गणपत वारगडा संपादित आदिवासी सम्राट, आप्पासाहेब मगर संपादित जनसभा, साहिल रेळेकर संपादित दीपोत्सव, राजमुद्रा फाऊंडेशनच्या राजमुद्रा, बबिता बर्वे संपादित सदैव जागृत आदी विविध दिवाळी विशेषांकांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या निमित्ताने म्हटले की, दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्राच्या साहित्यिक– सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वाची खूण आहे, त्यामुळे फराळ आणि फटाक्यांबरोबरच वार्षिक दिवाळी अंकांची फर्माईश ही मराठी माणसाची एक खासियत आहे. विविध माहिती आणि लेख, कला, कविता, लघुकथा, मुलाखत, प्रवासवर्णने भाषिक अलंकारांनी सजलेला दिवाळी अंक वाचकांना हवाहवासा वाटतो. डिजिटल युगात प्रसार माध्यमांत स्पर्धा वाढल्या आहेत, मात्र कितीही संकटे आली तरी दिवाळी अंकांच्या गेल्या १११ वर्षांच्या परंपरेत खंड पडलेला नाही. वाचकांची संख्या घटत आहे, अशी ओरड दरवर्षी होते, मात्र तसे न होता दर्जेदार साहित्यामुळे दिवाळी अंकांना मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अंक निर्माते, साहित्य दर्दी वाचकांसाठी सुखावह बाब असून ही साहित्य परंपरा अखंडित ठेवण्यासाठी आम्ही आपल्या पाठीशी सदैव आहोत, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना अधोरेखित केले.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कृतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी, यासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गेल्या २१ वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे, यंदा ही २२वी स्पर्धा आहे, असून बक्षिसांच्या रक्कमेत भरघोस वाढ करण्यात आली असून राज्यस्तरीय स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या मानकरीला एक लाख रुपये तर रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये बक्षिस देऊन सन्मानित करण्यात असून या स्पर्धेचा जास्तीत जास्त दिवाळी अंक निर्मात्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर त्यांनी या निमित्ताने केले.

या प्रकाशन सोहळ्यास भाजपचे युवा नेते समीर कदम, युवा नेते अमित घाग, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, सय्यद अकबर, असीम शेख, विशाल सावंत, किरण बाथम, शंकर वायदंडे, प्रवीण मोहोकर, सुभाष बसवेकर आदी उपस्थित होते.













**पनवेल : दिवाळी अंक आणि दिवाळी हे एक अतूट नाते असून दीपावली विशेषांक प्रकाशित करणे हे परंपरा आहे. त्यानुसार मंदार धोंदे आणि विवेक पाटील यांचा सिटी बेल, केवळ महाडिक यांचा दिवाळी संध्या हे दिवाळी अंक प्रकाशित केले आहेत. या दिवाळी अंकाचे प्रकाशन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या वेळी पत्रकार संजय कदम, प्रवीण मोहोकर, विशाल सावंत, शंकर वायदेडे, सय्यद अकबर, प्रशांत कदम, असीम शेख, किरण बाथम आदी उपस्थित होते.**





**पनवेल : येथील शिवाजी चौक येथे नादस्फूर्ती ढोल पथकाच्या गजरात दीपोत्सव मोठ्या उत्साहात झाला. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर हे उपस्थित होते. या दीपोत्सवाला माजी नगरसेवक राजू सोनी, मुकीत काझी, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, नीता माळी, शार उपाध्यक्षा सुहासिनी केकाणे, मिडल क्लास हौसिंग सोसायटी अध्यक्ष सुमित झुंझारराव, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी, पनवेल शहर युवा मोर्चा अध्यक्ष रोहित जगताप, युवा कार्यकर्ते केदार भगत आदी उपस्थित होते.**

## साईनगर येथे ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्राचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साईनगर येथील ज्येष्ठ नागरिकांना एकत्र बसून गप्पाटप्पा करण्यासाठी योग्य ते ठिकाण नव्हते. येथील ज्येष्ठ नागरिकांच्या सततच्या पाठपुरवठ्याने साईनगर येथील महापालिका उद्यानात माजी नगरसेवक मनोहर जानू म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे दिवाळीच्या मुहूर्तावर सोमवारी (दि. २४) ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते श्रीफळ वाढवून लोकार्पण करण्यात आले.

केंद्राचे उद्घाटन साईनगर येथील रहिवाशी ज्येष्ठ नागरिक शरद मोदी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या वेळी नगरसेवक मनोहर जानू म्हात्रे तसेच साईनगर रहिवाशी सर्वश्री पाटील, कांबळे, गोसावी, टेले, मुकुंद पाटील, अमोल साखरे, रूपेश घाग, रुपेश आंबोलकर, मयुरेश नेतकर, सचिन गमरे आणि पत्रकार लेखक दिलीप रेडकर उपस्थित होते. या वेळी साईनगर येथील ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने नगरसेवक मनोहर म्हात्रे यांचे आभार मानण्यात आले.

## ‘संवेदना’तर्फे आदिवासीपाडा, वृध्दाश्रमात दिवाळी साजरी

**पनवेल : प्रतिनिधी**

आपल्या स्वत:च्या आनंदा बरोबरच इतरांना ही आनंद देण्यासाठी २३ ऑक्टोबर रोजी संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे आदिवासीपाडा आणि वृध्दाश्रमात जाऊन दिवाळी साजरी करण्यात आली. तळोजाजवळील वावंजे वाडी, मानपाडा, खानाचा बांगला तसेच नेरेपाडा आदिवासी वाड्यांमध्ये ३५० घरांना दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. तर करुणेश्वर वृध्दाश्रम बानगर नेरे येथे ५० आजी आजोबा आणि आश्रमातील कार्यकर्ता सोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा सण हाच आनंदाचा क्षण संवेदना सख्या दरवर्षी वृध्दाश्रमात जाऊन आजी आजोबा किंवा आदिवासी बांधवांबरोबर जाऊन साजरा करत आहेत. संस्थेच्या सख्या स्वत:च्या घरात दिवाळी साजरी करण्यापूर्वी अजून काही घरांबरोबर दरवर्षी अशी दिवाळी साजरी करतात. कारण दिवाळीत लावत असलेल्या पणत्या केवळ शोभेसाठी नसतात किंवा घर उजळून निघते म्हणून लावायच्या नसतात तर त्याच्या मागेही भावना आहेत, ही पणती त्यागाचे प्रतिक आहे. ती स्वत: जळत राहून इतरांना प्रकाश देत असते. आपणही हीच त्याग भावना अंगी बाणवून आपल्या बरोबरच इतरांना या सणाचा आनंद देण्याचा प्रयत्न केला तर त्याचे आपणास लाभलेले समाधान खूप वेगळे आहे. ह्याचा प्रत्यय आपण प्रत्येकाने घेऊन बघावा, असे संस्थेच्या आध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी सांगितले

यावर्षी आजी आजोबांना फराळा बरोबरच त्यांना उपयुक्त असे पेन बाम, पेन रिलिफ मलम, उठणे, साबण असे किट देण्यात आले या किटमधील, उटणे हे दिव्यांग मुलांच्या शाळेतून तर स्नानादी पंचगव्य साबण हा गोशाळेतून घेऊन संवेदनातर्फे अजून दोन सामाजिक संस्थांना मदत करण्यात आली. तसेच गव्हाचे पिठ, साखर, रवा, शेवया, तेल, मिक्स मसाला, कडधान्य इ. उपयुक्त किराणा सामानही यावेळी देण्यात आले तसेच चार अनाथ मुलांना फराळ आणि शिधाही देण्यात आला.

या वेळी मानस कुलकर्णी, मधुरा गवाणकर, पुजा पन्हाळे, रामचंद्र गोसावी यांची एकसष्ठी असे चौघांचे वाढदिवस आज्जी आजोबांसोबत केक कापून साजरे करण्यात आले.





**पनवेल : दीपावलीनिमित्त राजे शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने सिंधुदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली आहे. जनमानसात इतिहासाविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच गड कोटांप्रती आदरभाव निर्माण व्हावा या उद्देशाने राजे शिवराय प्रतिष्ठान मागील वर्ष सातत्याने पुणे तसेच पनवेल येथे कार्यरत आहे. या प्रतिकृतीस माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी राजे शिवराय प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश पवळे, ‘रामप्रहर’चे व्यवस्थापक दादाराम मिसाळ आदी उपस्थित होते.**

## दिवाळी फराळाचे वाटप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी बजरंग दलाच्यावतीने रसायनी पाताळगंगा परीसरातील मोहोपाडावाडी, शिंदीवाडी, शिवनगर वाडी, पेरुची वाडी चावणे, वडगाव ठाकूरवाडी आदी आदीवासी वाड्यांतील आदीवासी कुटूंबांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

या वेळी जवळपास ४५० फराळाचे पॅकेट बजरंग दलाकडून देण्यात आले. वाटपाच्या वेळी आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले. रसायनीतील बजरंग दलाकडून नेहमीच विविध समाजोपयोगी उपक्रम सुरू असतात. चावणे दुर्गम भागातील आदिवासीबांधवाची हलाखीची परिस्थिती असल्याने दिपावली सणापासून दूर असतात. घरात कोणीही दिवाळी फराळ बनवत नसल्याने त्यांच्या लहान मुलांबाळांना दिवाळीचा फराळ मिळावा म्हणून बजरंग दलाने दिवाळी फराळ वाटप केल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

## करंजाडेमध्ये बॅटऱ्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरामध्ये दिवसेंदिवस चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. नुकतेच करंजाडे येथे नव्याने उभारण्यात येणाऱ्या विद्यूत सबस्टेशनच्या कामाच्या साईटवरील रूममध्ये ठेवलेल्या जवळपास एक लाख चोवीस हजार रुपये किमतीच्या ६२ बॅटऱ्यांची चोरी झाल्याची घटना घडली.

करंजाडे सेक्टर ६ या ठिकाणी विद्युत सबस्टेशन उभारण्याचे काम सुरू असून तेथील साईट वरील रूममध्ये जवळपास एक लाख चोवीस हजार रुपये किमतीच्या ६२ बॅटऱ्या ठेवल्या होत्या. त्या बॅटऱ्यांची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेल उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

दाऊदी बोहरा जमात पनवेल रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन रोटरॅक्ट क्लब आणि इनरव्हील क्लबच्या पनवेल उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

या वेळी आमिल मुर्तजा, साहेब हसनी, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी, शं. अलियासगर, सैफुद्दीन, कल्पेश परमार, हितेश राजपूत, रोटरी सदस्य कल्पना नांदगावकर, इनरव्हील सदस्य मुस्तफा वोहरा, आणि हॉस्पिटलचे डॉ. सकपाळ व त्यांचे सहकारी तसेच बोहरा समाज बांधव उपस्थित होते. या वेळी ५४ फळांच्या पाकीटांचे वाटप करण्यात आले.

## संपादकीय

# ब्रिटनचे नवे 'साहेब'!

भारतीय वंशाचा पंतप्रधान ब्रिटनमध्ये विराजमान झाल्यानंतर इतिहासाचे एक वर्तुळ पूर्ण झाल्याची भावना कुठल्याही भारतीय मनात घर करून राहील हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. ज्या इंग्लंड बेटावरील फिरंगी साहेबाने भारतावर दीडशे वर्ष राज्य केले, ज्या ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य कधीही मावळत नव्हता, त्या साम्राज्याच्या पंतप्रधानपदी भारतीय वंशाचा युवक विराजमान झाला ही तमाम भारतीयांसाठी अभिमानाची बाब मानली पाहिजे.

**इंग्लंडमधील साऊथहॅम्पटन भागात जन्मलेले, ऑक्सफर्ड आणि स्टॅनफर्ड विद्यापीठांत उच्च विद्या प्राप्त केलेले ४२ वर्षांचे ऋषी सुनक अखेर ब्रिटनचे पंतप्रधान झाले आहेत. ब्रिटिश साम्राज्याचे अधिपती किंग चार्ल्स तृतीय यांची बकिंगहॅम पॅलेस येथे अधिकृत भेट झाल्यानंतर ऋषी सुनक यांच्या पंतप्रधान पदावर शाही शिक्कामोर्तब झाले. येत्या २८ ऑक्टोबर रोजी ते पंतप्रधान पदाची सूत्रे स्वीकारतील. ऋषी सुनक धर्माने हिंदु असले तरी ते भारतीय नाहीत. ते अंतर्बाह्य ब्रिटिश आहेत. त्यांचे आईवडील भारतीय असून ऋषी सुनक यांचे संगोपन व शिक्षण इंग्लंड व युरोपमध्येच झाले आहे. इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती आणि प्रख्यात चिंतनशील लेखिका डॉ. सुधा मूर्ती यांचे ते जावई आहेत. ब्रिटिश अर्थव्यवस्था सध्या अतिशय अवघड परिस्थितीतून जात आहे. युरोपीय समुहातून वेगळे होण्याचा निर्णय घेतल्यानंतर ब्रिटनमध्ये आर्थिक अस्थैर्याचा कालखंड सुरू झाला. त्यात विविध कारणांनी परिस्थिती आणखी बिघडत गेली. कोरोना काळात जगातील साऱ्याच देशांच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले होते, त्याला ब्रिटनदेखील अपवाद नव्हता. ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांना पायउतार व्हावे लागल्यानंतर सत्ताधारी हुजुर पक्षात लिझ ट्रस यांनी ऋषी सुनक यांची घोडदौड काहिशी रोखली आणि त्या स्वत:च ब्रिटनच्या पंतप्रधान झाल्या, परंतु त्यांची कारकीर्द अवघ्या ४४ दिवसांची ठरली. कर आकारणीच्या प्रश्नावरून त्यांचे पाठबळ घटले व त्यांनादेखील पायउतार व्हावे लागले. सत्ताधारी हुजुर पक्षात पंतप्रधान पदासाठी पेनी मॉरडॉन्ट आणि ऋषी सुनक यांच्यात सुरस झाली. हुजुर पक्षाच्या ३५७ खासदारांपैकी सुनक यांना १४२ जणांनी पाठिंबा दिला. तर मॉरडॉन्ट यांच्याकडे अवघे २९ सदस्यांचे पाठबळ होते. नेतेपदी निवड होण्यासाठी आवश्यक असलेला किमान शंभर खासदारांचा पाठिंबा मिळणे शक्य नाही, असे लक्षात आल्यानंतर मॉरडॉन्ट यांनी माघार घेतली आणि हुजुर पक्षाचे नवे नेते म्हणून सुनक यांची बिनविरोध निवड झाली. ब्रिटनने गेल्या सहा वर्षांत प्रचंड राजकीय अस्थिरता अनुभवली आहे. आधुनिक लोकशाहीचे पाळणाघर समजल्या जाणाऱ्या या देशाने गेल्या सहा वर्षांत चार पंतप्रधान पाहिले आहेत. ब्रेग्झिट प्रकरणात अपयशी ठरल्याने थेरेसा मे यांनी तीन वर्षे बारा दिवस कारभार करून अखेर राजीनामा दिला होता. त्यानंतर आलेल्या बोरिस जॉन्सन यांनादेखील आपला कार्यकाळ पुरा करता आला नाही. लिझ ट्रस यांची कारकीर्द अल्पजीवीच ठरली. आता पंतप्रधान सुनक यांना ब्रिटनमधील डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्थेला सावरावे लागणार आहे. महागाई आणि वाढते व्याजदर यामुळे तेथील परिस्थिती स्फोटक बनली आहे. युक्रेन युद्धामुळे वीजदेयकाच्या समस्या अधिकच उग्र बनल्या आहेत. चलनबाजारात पाऊंड स्टर्लिंगची अवस्था नाजुक झाली आहे. अशा अवघड परिस्थितीत ब्रिटनची आंतरराष्ट्रीय आर्थिक विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्याचे कठीण आव्हान पंतप्रधान सुनक यांच्या समोर आहे.**

# दिवाळी सणात आत्मीयता राहिली नाही!





**खबरबात**
**नितीन देशमुख**

दिवाळी म्हणजे दिव्यांचा, प्रकाशाचा, आनंदाचा सण. मुलांना फटाके फोडायचे असतात, किल्ला बनवायचा असतो मजा करायची असते. दिवाळीची सुटी असल्याने अनेकांचे फिरण्याचे बेत ठरलेले असतात. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पर्यटनाचे काहींनी बेत केलेले असतात तर कोणाला मामाच्या गावाला जायचे असते. त्यामुळे लहानापासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच हवासा वाटणारा सण दिवाळी, पण आज त्यात आत्मीयता जाणवतच नाही.

वसुबारसपासून खरेतर दिवाळीला सरुवात होते. या दिवसापासून गृहिणी आपल्या दारात पणत्या लावायला सुरुवात करतात. गाय आणि वासराची पुजा करण्याची प्रथा काही भागात आहे. गाईला बाजारी व गूळ खाऊ घालतात. मुला बाळांना आरोग्य व सुख लाभावे म्हणून हा दिवस साजरा करतात. धनोत्रयोदशीला सायंकाळी घरातीला महिला अभ्यंग स्नान करतात. आपल्या घरातील देवासमोर घरातील धन ठेऊन त्याची पूजा करतात. धणे व गुळाचा नैवेद्य दाखवतात. घरी आकाश कंदील व पणत्या लावतात.

नरकचतुर्दशीला पहाटे लवकर उठून अंगाला सुगंधी तेल व सुगंधी उटणे लावून अभ्यंग स्नान करतात. हा दिवाळीचा मुख्य दिवस समजला जातो. या दिवशी नरकासूराचा वध करण्यात आला त्याचे प्रतीक म्हणून डाव्या पायाच्या अंगठ्याने चिराटी पायाने फोडण्याची प्रथा आहे. चिराटे सर्व अंगाला लावून मग आंघोळ करतात. यामागे चिराटे हे कडवट चवीचे असले तरी त्याच्या औषधी गुणधर्मामुळे अंगावर खरूज किवा इतर त्वचा रोग होऊ नये हा मूळ उद्देश असायचा. अभ्यंग स्नान झाल्यावर दिवा उतरण्यात येतो, मग देवाची पुजा करून घरातील देवाला फराळाचा नैवद्य दाखवून घरातील सर्वजण एकत्र फराळ करतात. लहान मुले व मोठी माणसे ही नवीन कपडे घालून फराळ घेऊन मित्रांबरोबर फिरायला जातात, फटाके फोडतात.

आश्विन अमावस्या या दिवशी लक्ष्मीपूजन करतात. हा दिवस व्यापाऱ्यांचा महत्त्वाचा दिवस असतो. या दिवसापासून त्यांचे नवीन हिशेब सुरू होत असतात. काही व्यापारी चोपडा पूजन करतात तर काही लक्ष्मी पूजन करतात पुजा झाली की व्यापारी मंडळी एकमेकांना भेटून शुभेच्छा देतात, मिठाई वाटतात. कार्तिक शुध्द प्रतिपदा म्हणजेच पाडवा साडेतीन मुहूर्ता पैकी एक मुहूर्त समजला जातो.



सूर्योदयापूर्वी सर्व खोल्यातील केर काढून त्यावर पणती व पैसे ठेऊन तो कचरा घराचे बाहेर ठेवतात. या दिवशी पत्नी पतीला ओवाळते पती तिला भेट वस्तु देतो. कार्तिक शुध्द द्वितीया यमबीज म्हणजेच भाऊबीज म्हणजे बहिणीने भावाला ओवाळायचा सण. भाऊ बहिणीला दिवा ओवाळल्यावर भेट वस्तु देतो. बहीण भावाला वाण देते. यामध्ये फळे, सुकामेवा, मिठाई व पैशाचे नाणे असते. यादिवशी भाऊ येणार म्हणून जेवणाचा खास बेत केला जातो. बहीण आपल्या माहेराहुन येणाऱ्या भाऊरायाची वाट पाहत असते.

दिवाळीत पहाटे लवकर उठल्यावर थंडीत कुडकुडत आंघोळ झाली की नवीन कपडे घालायचे आणि मग चार-पाच मित्र मिळून सायकल वरुन फिरायला जाण्यात वेगळीच मजा असायची. सायकलने २५ - ३० किमी अंतरावरील किल्ल्यावर किवा देवळात जायचे. त्यावेळी गावात दोन -चार मोटरसायकल किंवा स्कूटर असायच्या. त्यामुळे सायकल असणारा मित्र ही श्रीमंत वाटायचा. सायकल नसलेल्या मित्राला डबल सीट घेऊन सोबत नेण्यात कधीच कोणाला कमी पणा वाटायचा नाही. एखाद्या नदी किनारी किवा तलावाजवळ झाडाखाली बसून सोबत आणलेला फराळ एकत्र बसून खाण्यात मजा यायची. आज फराळाचे फोटो मोबाइलवरून पाठवण्याचा जमाना आहे. त्यामुळे ती मजा आजच्या पिढीला अनुभवता येत नाही.

कोरोनानंतर प्रथमच यावर्षी खुल्या वातावरणात सण साजरे करायला मिळत आहेत. पूर्वी दिवाळीत थंडी असायची. पण यावर्षी अनेक भागात पाऊसच होता. पूर्वी दिवाळी सण साजरा करताना एक आत्मीयता होती. त्यावेळी एकमेकांना भेटून शुभेच्छा देण्यात आपुलकी होती. प्रत्येक गृहिणीला आपण बनवलेला फराळ देण्यात आनंद वाटायचा. घरातील तरुण मुली दारा समोर सुंदर रांगोळी काढायच्या त्याची दिवसभर तयारी सुरू असायची. आज तरूण पिढी मोबाइलवरून व्हॉट्सअॅपवर मेसेज पाठवण्यात धन्यता मानते. बाजारातला तयार फराळ आणला जातो. प्लॅस्टिकच्या तयार रांगोळ्या दारा समोर मांडल्या जातात. फराळा ऐवजी मिठाईचे बॉक्स देण्याला महत्व आले. आपला मोठेपणा दाखवण्याची संधी म्हणून मोठमोठया वस्तु भेट देण्याची प्रथा पडली आहे. दिवाळी पहाट सारखे कार्यक्रम पाहण्यात वेळ जात असल्याने फिरणे व एकत्र बसून गप्पा मारीत फराळ करण्याची मजा राहिली नाही हेच खरे...

## बदलते तंत्रज्ञान

# 'ह्या' अॅपचा वापर व्हॉट्सअॅपला पर्याय

व्हॉट्सअॅपची सेवा अनेकदा डाऊन झाली आहे, पण लगेच पुन्हा पुर्ववत सुरू झाले होते, मात्र काल गेल्या पाऊणतासापासून डाऊन झाले आहे, त्यामुळे अनेकांनी तक्रारी सुरू केल्या आहेत. आता अनेकजण व्हॉट्सअॅपला पर्याय शोधत होते.

भारत, मध्य पूर्व आणि आफ्रिकेसह जगातील अनेक भागांमध्ये अॅपची सेवा बंद झाली. व्हॉट्सअॅप मेसेजिंग सेवा जवळपास ३० मिनिटांपासून ठप्प झाली होती. ट्विटरवरील इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर, वापरकर्ते व्हॉट्सअॅपसेवा ठप्प झाल्याची तक्रार करण्यात आल्या.

आता आपण इतर कोणतेही पर्यायी अॅप्सदेखील वापरू शकता. इन्स्टंट मेसेज प्लॅटफॉर्मची सेवा केवळ व्हॉट्सअॅपवरच नाही तर इतर अनेक अॅप्सवरही उपलब्ध आहे. व्हॉट्सअॅपला पर्याय म्हणून तुम्ही हे अॅप वापरू शकता.

**Telegram :** व्हॉट्सअॅपला पर्याय म्हणून टेलीग्राम या अॅपचा सर्वाधिक वापर केला जातो. तुम्हाला या प्लॅटफॉर्मवर व्हॉट्सअॅपचे आणखी फीचर्स मिळतात. यावर तुम्हाला चॅनेल आणि इतर फीचर्स मिळतात. अधिक फीचर्स असूनही हे अॅप व्हॉट्सअॅपइतके लोक वापरत नाहीत. हे अॅप iOS आणि Android दोन्ही प्लॅटफॉर्मवर विनामूल्य उपलब्ध आहे.

**Signal :** व्हॉट्सअॅपला पर्याय म्हणून Signal या अॅपचाही वापर केला जातो. गोपनीयता आणि सुरक्षिततेच्या बाबतीत, हे अॅप आधीपासूनच व्हॉट्सअॅपवरून अनेक वैशिष्ट्ये ऑफर करते. तुम्हाला व्हॉट्सअॅपचा पर्याय हवा असेल तर तुम्ही त्याचा वापर करू शकता. हे अॅप iOS आणि -ndroid दोन्ही प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. आपण ते विनामूल्य डाउनलोड करू शकता.

**Discord :** Discord हा प्लॅटफॉर्म इन्स्टंट मेसेजिंग अॅप म्हणून सुरू झाला नाही. त्याऐवजी ते ग्रुपमध्ये मेसेजसाठी बनवले होते, पण आता तुम्ही व्हॉट्सअॅपला पर्याय म्हणून वापरू शकता. त्याचे डीएम फीचर अनेकांना खूप आवडते. तुम्ही हे अॅप सर्व Android, iOS, Windows, Linux, MacOS वर वापरू शकता.

**Snapchat :** या अॅपवर तुम्हाला व्हॉट्सअॅपसारखे वाटणार नाही तर हे इन्स्टाग्रामसारखे वाटणार आहे, पण तुम्ही इन्स्टंट मेसेजिंगसाठी याचा वापर करू शकता. तुम्ही हे अॅप Android आणि iOS दोन्ही प्लॅटफॉर्मवर मोफत डाउनलोड करू शकता.

# 'लक्ष्या'त राहणारा विनोदाचा बादशहा

विनोदाचे अत्यंत अचूक टायमिंग, खेळकर स्वभाव व भन्नाट बोलण्याची पद्धत यामुळे ज्यांनी मराठी रसिकांच्या मनावर राज्य केले असे विनोदाचे बादशहा म्हणजेच विनोदी अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे...



लक्ष्मीकांत बेर्डे यांचा जन्म २६ ऑक्टोबर, १९५४ साली झाला. मुंबईतील गिरगावमधील कुंभारवाड्यात लहानाचा मोठा झालेल्या लक्ष्याने युनियन हायस्कूलमध्ये त्याचं शालेय शिक्षण पूर्ण केलं, तर भवन्स कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेतलं. याच दरम्यान कॉलेजमध्ये असताना ते एकांकिकांमध्ये सहभाग घेत होते. अनेक वेळा साहित्य संघ मंदिरात त्यांनी बॅक स्टेजवरही काम केलं. या काळामध्ये त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. हा प्रवास सुरू असतानाच त्यांच्या 'टूरटूर' या नाटकाने यशाचं शिखर गाठलं. त्यानंतर त्यांना महेश कोठारेच्या 'धुमधडाका' (१९८५) या चित्रपटातून मोठा ब्रेक मिळाला. 'टूरटूर' आणि 'धुमधडाका' या दोन्ही माध्यमातून त्यांनी आपले अष्टपैलुत्व दाखवून प्रचंड लोकप्रियता मिळवली. नाटकाच्या माध्यमातून थेट प्रेक्षकांपर्यंत पोहोचता येते म्हणून त्याने 'कार्टी उडाली भुर्र' हे नाटक स्वीकारले.

मराठी नाटक, चित्रपटांचा हा प्रवास सुरू असतानाच 'मैने प्यार किया' या चित्रपटामधून त्यांचा हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश झाला. त्यानंतर 'साजन', 'हम आपके हैं कौन' इत्यादींत त्यांनी काम केले. मराठीत 'दे दणादण', 'अशी ही बनवाबनवी', 'थरथराट', 'धडाकेबाज', 'हमाल दे धमाल', 'रंगत संगत', 'पटली रे पटली', 'एक होता विदूषक' असे अनेक चित्रपट त्यांच्या कारकिर्दीतील हा खूपच महत्त्वाचा टप्पा होता. जोडीला वर्षा उसगावकर, दिलीप प्रभावळकर, निळू फुले, मधु कांबिकर, उषा नाईक, पूजा पवार, विजय चव्हाण अशा तगड्या कलाकार मंडळींची साथही त्यांना मिळाली होती.

लक्ष्मीकांत बेर्डे या नावाने मराठी चित्रपटसृष्टीत दीड ते दोन दशकं अक्षरश: धूमाकुळ घातला. विनोदाचे अत्यंत अचूक टायमिंग असणारा हा अभिनेता. पण केवळ विनोदी अभिनेता असे त्यांचे वर्णन करणे त्यांच्यावरचा अन्याय ठरेल. 'लक्ष्या' या नावाने अबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रिय पसरली. त्यांची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासमवेत. कोठारेंचा चित्रपट अन् लक्ष्या नाही, असे सहसा घडलेच नाही. कारण, कोठारे व बेर्डे म्हणजे व्यावसायिक यशाची हमखास खात्री अशी ओळख निर्माण झाली होती. त्याचबरोबर या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी हे समीकरणही रूढ झाले होते. 'धुमधडाका', 'धडाकेबाज', 'थरथराट', 'झपाटलेला', 'पछाडलेला', 'खबरदार'पर्यंत ते कायम होते. सचिनबरोबरही त्यांनी 'बनवाबनवी'सह अनेक चित्रपट केले.

राजश्री प्रॉडक्शनचा 'मैने प्यार किया' हा त्यातीलच एक. यात लक्ष्मीकांतने सलमान खानच्या मित्राची भूमिका अगदी छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. 'हम आपके है कौन' मधील लक्ष्याने निभावलेली भूमिका काबिलेतारिफ होती. नोकराच्या भूमिकेत असणारा संयम व भावनाशीलता त्यांनी उत्तमरीत्या साकारली होती. 'झपाटलेला'मधील त्यांची भूमिका विलक्षण गाजली. 'तात्या विंचू आणि लक्ष्या' यावर आजही मोठे विनोद होतात. 'अशी ही बनवाबनवी' चित्रपटात लक्ष्याने साकारलेली बाई प्रचंड गाजली. लक्ष्मीकांत बेर्डे यांचं रुही या चित्रपट अभिनेत्री सोबत लग्न झालं होतं. रुही बेर्डे यांनी 'मामला पोरीचा', 'आराम हराम आहे' या चित्रपटात भूमिका केली, तसेच अनेक मराठी चित्रपट आणि नाटकेदेखील केली.

मराठी चित्रपटसृष्टीमध्ये आजवर अनेक गुणी कलाकारांनी त्यांच्या अभिनयामुळे प्रेक्षकांची मनं जिंकली. या सार्या उत्तम कलाकारांच्या गर्दीत आजही एक नाव कायम अग्रस्थानी आहे ते म्हणजे दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे. सगळ्यांना खळखळून हसविणार्या या विनोदाच्या बादशहाने १६ डिसेंबर २००४ साली जगाचा निरोप घेतला. मात्र, त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीला दिलेल्या योगदानामुळे आजही ते सार्यांच्या स्मरणात आहेत.

**-आशिष निनगुरकर**

**क्लिक...क्लिक...!**



**नवी मुंबई : नेरूळ येथील आयुष्य जाधव, जय तळेकर, मेहुल सावळे, भक्ती पाटील, श्रावणी इंगोले, स्नेहा आदी बालकलाकारांनी बनविलेला किल्ला.**

## आरोग्य प्रहर

# अशी घ्या त्वचेची काळजी

दिवाळीच्या दिवशी अनेक शहरांमध्ये फटाके फोडण्यात आले. काही ठिकाणी फटाक्यांवर बंदी असूनही फटाके लावण्यात आले असून प्रदूषणाचा स्तर फारच वाढला आहे. या प्रदूषणाचा आपले आरोग्य आणि त्वचा या दोन्हींवर परिणाम होतो. वायू प्रदूषणामुळे त्वचेवर घाण जमा होऊन पिंपल्स येऊ शकतात.



रिपोर्ट्सनुसार, वायू प्रदूषणामुळे आपल्याला श्वास घ्यायला त्रास होतोच, पण त्यामुळे आपण अकाली म्हातारेही होऊ शकतो. चुकीचा आहार, ताणतणाव आणि त्वचेची नीट निगा न राखणे यासोबतच वायू प्रदूषणामुळेही त्वचेची सर्वाधिक हानी होते. हवेमध्ये काही घटक असतात, ज्यांना पार्टिक्युलेट मॅटर म्हणून ओळखले जाते, त्यातील काही घटक आपल्या डोळ्यांना दिसत नाहीत, पण ते त्वचेसाठी खूप नुकसानदायक असतात. वायू प्रदूषणापासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी काही टिप्सचा अवलंब केल्यास त्वचेची अधिक चांगली काळजी घेता येऊ शकते.

**अधिक एसपीएफ असलेले सनस्क्रीन** - हवेत असलेल्या प्रदूषणांच्या कणांमुळे आपली त्वचा काळसर आणि निर्जीव होते. अशी वेळी त्वचेवर अधिक एसपीएफ असलेले सनस्क्रीन लावावे. त्यामध्ये असलेले घटक हे त्वचेला घाणीपासून वाचवतात, तसेच ती बरी करण्यासही मदत करतात. तज्ज्ञांच्या सांगण्यानुसार, या काळात जेल बेस्ट सनब्लॉक क्रीमचा वापरही उत्तम ठरू शकतो.

**गुलाब पाणी** - त्वचेला एखादे लोश लावण्यापूर्वी त्वचा हायड्रेट करा. त्यासाठी तुम्ही गुलाब पाण्याची मदत घेऊ शकता. त्यासाठी एक कापसाचा बोळा घेऊन तो गुलाब पाण्यात भिजवावा आणि चेहऱ्यावर लावावा. या उपायामुळे तुमच्या त्वचेचे प्रदूषणापासून संरक्षण होते. तसेच रात्री झोपण्यापूर्वीही चेहरा आणि हात गुलाब पाण्याने जरूर स्वच्छ करावेत. असे केल्याने त्वचेवरील घाण साफ होईल.

**कॅलामाइन लोशन** - हवेमध्ये असलेल्या विषारी कणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी कॅलेमाइन असलेले लोशन लावा. याचे घटक त्वचेला वायू प्रदूषणापासून सुरक्षित ठेवण्याचे काम करतात. वायू प्रदूषणाचा वाढता प्रभाव लक्षात घेता हा उपाय तुम्ही दिवसभरातून दोनदा जरूर करावा.

**फेसपॅक** - चेहरा धुणे आणि सनस्क्रीन वापरणे, याशिवायही त्वचेची अधिक काळजी घेण्याची गरज आहे. यासाठी फेस पॅकचा वापर जरूर करावा. त्यासाठी कोरफड जेल किंवा इतर पदार्थांचा उपयोग करून फेस पॅक किंवा फेस मास्क बनवू शकता. ते चेहऱ्यावर लावल्याने त्वचेवर साचलेले विषारी कण सहज दूर होतील.

## पेण-पाबळ विभागातील कार्यकर्त्यांचा
# बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश

**दिवाळीनंतर पक्ष वाढवण्याचे काम जोमाने करणार -आमदार महेंद्र दळवी**



**पेण : प्रतिनिधी**

पाबळ विभागातील शेकाप तसेच उद्धव ठाकरे गटातील असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत दिवाळी मुहूर्तावर बाळासाहेबांची शिवसेना (शिंदेगट) पक्षात प्रवेश केला. दिवाळीनंतर बाळासाहेबांची शिवसेना वाढवण्याचे काम जोमाने करणार असल्याचे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.

उद्धव ठाकरे गटाचे पाबळ विभाग प्रमुख नरेश शिंदे, पाबळ ग्रामपंचातीचे तीन विद्यमान सदस्य, वरप ग्रामपंचयतीचे दोन विद्यमान सदस्य व एक माजी सदस्य यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आमदार महेंद्र दळवी यांच्या राजमळा येथील निवासस्थानी जाऊन बाळासाहेबांची शिवसेना (शिंदेगट) पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

महाराष्ट्राचा विकास होण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बरोबर आहोत. आमच्यावर विश्वास ठेऊन तुम्ही बाळासाहेबांची शिवसेना पक्षात आलात, हे आनंदाचे आहे. आम्ही लोकांच्यात असतो, लोकांचे सुख दुःख जाणतो. पक्षाचा यापुढील मेळावा पाबळ विभागात होईल असे आमदार दळवी यांनी या वेळी सांगितले.

शिंदेगटाचे जिल्हाप्रमुख राजा केणी, जिल्हा संघटक मयुर गंभीर, तालुका प्रमुख तुषार मानकवळे, संजय म्हात्रे, पेण तालुका संपर्क प्रमुख यशवंत मोकल, ज्ञानेश्वर शिर्के, बापू शिद यांच्यासह कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# चॉकलेट्समध्ये आढळल्या आळ्या

## साजगाव ग्रामपंचायतीची दुकानावर कारवाईची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील साजगाव ग्रामपंचायतीने दिवाळीनिमित्त वाटप केलेल्या मिठाईमध्ये आळ्या सापडल्याने खळबळ उडाली असून, जेथून ही मिठाई खरेदी करण्यात आली, त्या खारघर येथील ड्रायफ्रुट्सच्या दुकानावर कठोर कारवाई करण्याची मागणी साजगांव ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी केली आहे.



(छाया : विनायक माडपे)

दिवाळीत फराळ आणि मिठाईला मोठी मागणी असते. दिवाळीच्या शुभेच्छा देताना ड्रायफ्रुट, मिठाई आणि चॉकलेट दिले जातात. साजगाव ग्रामपंचायतीने खारघर येथील ड्रायफ्रुट्सच्या दुकानातून ८४ हजार रुपयांचे मिठाईचे ९९ बॉक्स आणले होते. या बॉक्समधील चॉकलेटमध्ये आळ्या सापडल्याचे निदर्शनास आल्याने एकच खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायत सदस्य विराज देशमुख, भारती शिंदे आणि ललिता पाटील यांनी या प्रकरणी संताप व्यक्त करीत संबंधित दुकानदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ग्रामविकास अधिकारी विनोद चांदोरकर यांनी सरपंच, उपसरपंच आणि अन्य सदस्यांनी ही मिठाई आणल्याचे सांगत आपला या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. उपसरपंच विनोद गायकवाड आणि सदस्य अजित देशमुख यांनी आपल्याला या प्रकरणाची माहिती मिळताच चॉकलेट असलेले सर्व बॉक्स परत मागवल्याचे सांगितले. संबंधित दुकानदाराशी संपर्क करून त्याला या घटनेची माहिती दिल्याचेही गायकवाड आणि देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. या दुकानदारावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडे तक्रार करणार असल्याची माहितीही या दोघांनी दिली आहे.

ड्रायफ्रुटच्या व्यवस्थापकाने आपल्या दुकानातून गेलेल्या चॉकलेटमध्ये आळया असल्याचे सुरुवातीला नाकारले होते. नंतर मात्र त्याने चूक झाल्याचे कबूल केले. धक्कादायक बाब म्हणजे ८४ हजार रुपयांची खरेदी केल्यानंतरही दुकानदाराने कोणतेही बिल दिलेले नाही. त्यामुळे लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या आणि जीएसटी बुडवून सरकारचे नुकसान करणाऱ्या खारघरमधील ड्रायफ्रूटच्या या दुकानावर कारवाई करण्याची मागणी साजगाव परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# नागाव येथे दिवाळी पहाट

**रेवदंडा : प्रतिनिधी**

दीपावलीनिमित्ताने नागाव येथील श्री वंखनाथ मंदिर ग्रामस्थ मंडळाने सोमवारी (दि. २४) मंदिराच्या सभागृहात दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित केला होता.

गायक निलेश बुवा जंगम (रा. मुळे ), चंद्रकांत बुवा नवगावकर (रा. थळ), महेश बुवा पाटील (रा. गोंधळपाडा), संजय बुवा डबे (रा. आग्राव) यांनी या कार्यक्रमात भक्तीगीते, भावगीते सादर केली. त्यांना महेश ठाकूर आणि सुभाष नाईक (नागाव) यांनी साथ दिली. नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच निखिल मयेकर, माजी सरपंच नंदु मयेकर, ग्रामपंचायत सदस्य हर्षदा मयेकर, आदेश मोरे, ज्येष्ठ कार्यकर्ते राजु मयेकर, मंदार वर्तक यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागाव ग्रामपंचायत सदस्य सुरेंद्र नागलेकर व श्री वंखनाथ मंदिर ग्रामस्थ मंडळ यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



# भाजपच्या वतीने पेणकरांना सूरमयी भेट



(छाया : अनिस मनियार)





**पेण : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष पेण शहराच्या वतीने मंगळवारी (दि. २५) दिवाळी सणानिमित्त सुमधुर गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

गायक संतोष पाटील व त्याचे सहकारी जगदीश पाटील, विद्या जोशी-शिवलिंग, अश्विनी म्हात्रे यांच्या सुश्राव्य गीतांनी या कार्यक्रमात रंगत आणली. पेणच्या विकासासाठी निधी कमी पडून देणार नाही. विकासकामे यापुढेही सुरूच राहणार आहेत. त्यासाठी नागरिकांनी एकत्र राहावे व गुण्यागोविंदाने सण साजरे करावेत, असे आवाहन करून आमदार रविशेठ पाटील व माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांनी या वेळी नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

पेणच्या माजी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, शहर अध्यक्ष हिमांशू कोठारी, ज्योती म्हात्रे, माजी नगराध्यक्ष रघुनाथ बोरेकर, माजी उपनगराध्यक्ष दिलीप लाड, माजी सभापती प्रकाश पाटील यांच्यासह रसिकश्रोते या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोमसाप मुरूड शाखेतर्फे दीपसंध्या मैफिल



**मुरूड : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) मुरूड शाखेतर्फे दीपावलीनिमित्त रविवारी (दि. २३) संस्थेच्या उपाध्यक्ष उषा खोत यांच्या निवासस्थानी आठवणींची दीपसंध्या मैफिल उत्साहात झाली.

कोमसाप मुरूड शाखेच्या उपाध्यक्ष उषा खोत उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर अरुण बागडे यांनी गणेशवंदनेनी मैफिलीची सुरवात केली. प्रसिध्द गायिका प्रतिभा मोहिले यांनी शास्त्रीय गायन केले. ज्येष्ठ गायक डॉ. रवींद्र नामजोशी यांनी शास्त्रीय सांगिताविषयी माहिती देत तसेच अधूनमधून गाणी सादर केली. अमोद पाटील यांच्या बासरी वादन केले.

आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत दुचाकीवरून २१ हजार किलोमीटर अंतर ७५ दिवसात पार करणाऱ्या प्रसाद चौलकर यांचा शाखेच्या वतीने शाखाध्यक्ष संजय गुंजाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रसाद चौलकर, ओवी पाटील, स्वरांगी पेंडसे यांनी गाणी सादर केली. गीतगायनानंतर काव्य व अभिवाचनाचे सत्र सुरू झाले. या सत्रात रुद्धी भगत, शिवानी सुभेदार, नैनिता कर्णिक, ओम जोशी, प्रतिभा जोशी, श्रुती मसाल, शिवम चव्हाण, प्रसाद चव्हाण, आशुतोष कर्णिक, दीपाली दिवेकर, प्रसाद चौलकर, आशिष पाटील, योगेश दवटे, अरुण बागडे, सिद्धेश लखमदे यांनी कविता, अभिवाचन व अनुभव कथन करून उपस्थितांची मने जिंकली. संजय गुंजाळ यांनी नटसम्राट नाटकातील सादर केलेल्या प्रसंगाने सर्वांचे डोळे पानावले.

प्रतीक कातारे यांनी काढलेल्या रांगोळीचे सर्वांनी कौतुक केले. या आठवणींची दीपसंध्या मैफिलीचे सूत्रसंचालन अस्मिता पेंडसे यांनी केले. सिद्धेश लखमदे यांनी आभार मानले.



खोपोली : राज्य शासनाच्या आनंद शिधा या उपक्रमाचा शुभारंभ खोपोलीत सोमजाईवाडी येथील शिधावाटप दुकानात भाजपचे शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी युवा मोर्चाचे अध्यक्ष अजय इंगुलकर, व्यापारी सेलचे किर्ती ओसवाल, जितेंद्र शाह यांच्यासह नागरिक उपस्थित होते. (छाया : विनायक माडपे)


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. 02145 222167**

**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ४९ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे (बी-१) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाना रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, पी. जी. रिसर्च सेंटर इमारतीचे बांधकाम करणे. ता. माणगाव, जि. रायगड. | ५,११,८०,२४०/- | ५,०५,८५,२७५/- | २,५५,०००/- | ३५४० | २४ महिने |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | **दिनांक २८/१०/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते **दिनांक २२/११/२०२२** (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, (सा.बां.) प्रादेशिक विभाग, कोकण, फोर्ट मुंबई यांचे कार्यालय दिनांक **१५/११/२०२२** वेळ १५.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई, यांचे कार्यालयात दि. **२५/११/२०२२** वेळ १२.०० वाजता |

**टिप :-**

परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड.**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४५३१**
**दिनांक : २१/१०/२०२२**


# कर्जतमध्ये शास्त्रीय संगिताची मेजवानी





(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

अनाहत संस्थेचया वतीने कर्जतमध्ये दिवाळी प्रभातचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी गायक कलाकारांनी गीते सादर करून उपस्थितांना शास्त्रीय संगिताची मेजवानीच दिली.

शास्त्रीय संगिताचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या अनाहत संस्थेच्या वतीने कर्जतच्या महिला मंडळ शाळेतील सभागृहात 'प्रभाती' या दिवाळी प्रभात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अनाहतच्या लोगोचे लोकार्पण व्याख्यात्या मृदुला गडणीस यांच्या हस्ते केले.

कार्यक्रमाची सुरुवात अक्षय वर्धावे यांच्या शास्त्रीय गायनाने झाली. त्यांनी प्रथम 'ललत पंचम' हा जोडराग (विलंबित, द्रुत तीन ताल) अतिशय तयारीने मांडला. त्यानंतर अल्हैया बिलावल रागातील मध्यलय तीन तालातील एक फारच क्वचित ऐकली जाणारी पर्शियन भाषेतील बंदीश, तराणा ग्वाल्हेर गायकीच्या अंगाने पेश करुन उपस्थित रसिकांची मने जिंकली. दिवीजा पुरोहित, स्वाती गुरव आणि मनाली मते-जोशी यांनी उपशास्त्रीय गायनात भक्तीसंगीत सादर करून उपस्थित रसिकांची वाहव्वा मिळविली. यामध्ये दिवीजा पुरोहित यांनी संत तुकाराम महाराजांचा 'विष्णूमय जग' हा अभंग सादर केला तर स्वाती गुरव हिने सादर केलेल्या 'कशी जाऊ मी वृंदावना मुरली वाजवी कान्हा' या गौळणीला उपस्थित रसिकांनी वन्समोअर देऊन तिचे कौतुक केले. मनाली मते-जोशी यांनी 'अवघे गरजे पंढरपूर' या रचनेचे अतिशय सुरेल सादरीकरण केले. त्यांना संवादिनीवर ऋतजा कर्वे, तबल्यावर अतुल गोडसे, मृदुंगावर कौशिक वांजळे यांनी साथ संगत केली. सूत्रसंचालन सानिका कर्वे यांनी केले.

प्रसाद पाटील, धनंजय बेडेकर, श्रीराम पुरोहित, पंकज पाटील, सुचिता वांजळे, पांडुरंग गरवारे, विकास चित्ते, ईश्वर आरेकर, दिगंबर कांबळे, राजन दगडे, विजय बेडेकर, विराज वैद्य, राजेंद्र पाटील, जान्हवी मुळे, अर्चिस पुरोहित आदींसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवाळीमध्ये स्वच्छतेचा जागर

## नवी मुंबई महापालिकेतर्फे रात्रीपासून पहाटेपर्यंत अभियान



### मोहीमेची प्रशंसा

**सकाळी दिवस उजाडण्याच्या आत मध्यरात्रीपासून पहाटेच्या कालावधीत ही विशेष साफसफाई मोहीम राबविण्यात आल्याने सकाळी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांनी स्वच्छ रस्ते, चौक पाहून या विशेष स्वच्छता मोहीमेची प्रशंसा केली. महत्वाचे म्हणजे मध्यरात्री व पहाटे ही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असली तरी दररोज सकाळी होणारी साफसफाई नियमीतपणे सुरू असल्याने समाधानकारक अभिप्राय व्यक्त करण्यात आले.**

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये विविध साहित्य खरेदीचे प्रमाण मोठे असल्याने बाजारपेठा गजबजून गेलेल्या दिसतात. त्यामुळे कचऱ्याच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे दिवाळीच्या कालावधीत वेगवेगळ्या प्रकारचे फटाके वाजविले जात असल्याने रस्त्यावरील कचऱ्यात लक्षणीय भर पडलेली आढळून येते. याकरिता लक्ष्मीपूजनाच्या सणानंतर त्या रात्री म्हणजेच २४ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजल्यापासून बेलापूर ते दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात स्वच्छतेची विशेष मोहीम २५ ऑक्टोबर रोजी पहाटे ३ वाजेपर्यंत राबविण्यात आली.

या विशेष स्वच्छता मोहीमेकरिता ३५६ सफाई कर्मचारी यांची विशेष नेमणूक करण्यात आली होती. आठ पिकअप वहाने आणि आठ आरसी वहाने यांच्या माध्यमातून या स्वच्छता मोहीमेत गोळा करण्यात आलेला कचरा तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहतूक करून शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी वाहून नेण्यात आला. स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे या संपूर्ण साफसफाई मोहीमेच्या नियोजनबध्द कार्यवाहीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. त्यांनी मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनवणे यांच्यासह पहाटे स्वच्छता कामांची पाहणी केली.

शहरातील आठही विभागातील मुख्य रस्ते, वर्दळीची ठिकाणे, बाजारपेठा, मुख्य चौक अशा गजबजलेल्या ठिकाणी रात्री ११ ते पहाटे ३ या कालावधीत राबविलेल्या या विशेष साफसफाई मोहीमेमध्ये हार, फुले. खाद्यपदार्थ यांचा ८ टन ओला कचरा तसेच कागद, पुठ्ठे, कापड यांचा १५ टन सुका कचरा गोळा करून तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.

नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दीपावली सणाच्या कालावधीत शहर स्वच्छतेवर अधिक काटेकोर लक्ष देण्यात आलेले आहे.

# खोपटे येथे बेंचेसचे लोकार्पण

**उरण : बातमीदार**

खोपटे गावातील स्मशान भूमीमध्ये अंत्यसंस्कार झाल्यानंतर ज्येष्ठांना, दिव्यांग बांधवांना बसण्यासाठी जागा नव्हती. त्यामूळे ज्येष्ठांना, दिव्यांगांना बसण्यासाठी स्वराज्य ग्रुप खोपटे उरणच्या माध्यमातून कै. जितेश जगन्नाथ ठाकूर यांच्या स्मरणार्थ बेंचसचे लोकार्पण सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.



स्मशानभूमीत बेंचेसची व्यवस्था झाल्याने गावातील नागरिक, ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अंत्यसंस्कारासाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना आता स्मशान भूमीमध्ये बँचेसवर बसून आराम करता येणार असल्याने ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधवानी स्वराज्य ग्रुप खोपटे उरणच्या कार्याचे कौतूक केले आहे.

या वेळी बांधपाडाचे सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, खोपटा अध्यक्ष विश्वनाथ भास्कर पाटील, तंटा मुक्ती अध्यक्ष प्रमोद ठाकूर, सदस्य अच्युत ठाकूर, सदस्या जागृती घरत, सदस्य संदेश म्हात्रे, बांधपाडा अध्यक्ष प्रकाश ठाकूर, यशवंत ठाकूर, खोपटा सचिव कुमार ठाकूर, पाणी कमिटी सचिव विष्णू पाटील, भाजप खोपटा अध्यक्ष नवनाथ ठाकूर, समीर पाटील, स्वराज्य ग्रूपचे अध्यक्ष प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, जितेशचे नातेवाईक तसेच स्वराज्य ग्रूपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : दिवाळीनिमित्त माजी नगरसेविका हेमलता हरिश्चंद्र म्हात्रे यांच्यातर्फे एचओसी कॉलनी मागील कातकरी वाडी व सिमरन मोटर येथील कातकरी वाडी येथे सुगंधी उटणे व फराळ वाटप करण्यात आले. या वेळी गणेश म्हात्रे, कमल म्हात्रे, आकाश डोंगरे, उज्वला पाटील, हर्षल म्हात्रे, हेमंत म्हात्रे, सुरेश पाटील, सर्वेश पाटील, अविनाश पाटील, प्रथमेश म्हात्रे आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.**

# जेएनपीए बंदरात विविध स्वच्छता उपक्रम

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जेएनपीएमध्ये 'विशेष स्वच्छता मोहीम २.०' राबविण्यात आली. या मोहिमेचा उद्देश 'स्वच्छ भारत २.० मोहिमेंतर्गत समाजामध्ये स्वच्छतेचे महत्त्व व त्याचे विविध पैलू याबाबत जागरूकता निर्माण करणे आहे. संपूर्ण मोहिमेदरम्यान स्वच्छतेचे महत्त्व यावर भर देण्यात आला.



'विशेष स्वच्छता मोहीम २.०' राबविण्या मागील मुख्य उद्देश्य स्वच्छता, सुशासन, अनुपालनाचे ओझे कमी करणे आणि जीवन सुलभ करणे यास प्रोत्साहन देणे हे आहे. केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या अखत्यारीतील देशातील सर्व प्रमुख बंदरे व अधीनस्थ कार्यालये, आपली कार्यालये आणि कार्यालयीन परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आणि स्वच्छतेमध्ये सुधारणा करण्यासाठी विविध प्रयत्न करत आहेत.

स्वच्छता मोहिमेचा एक भाग म्हणून जेएनपीएने बंदर व आसपासच्या परिसराची स्वच्छता केली. यापूर्वी, बंदर परिसर स्वच्छ आणि हिरवागार ठेवण्यासाठी जेएनपीएचे कर्मचारी आणि भागधारकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वच्छता पखवाडा सुद्धा आयोजित करण्यात आला होता, ज्यामुळे देशाच्या स्वच्छतेचे एकंदर उद्दिष्ट साध्य होण्यास मदत झाली. हरित आणि स्वच्छ पर्यावरणास चालना देण्यासाठी जेएनपीएमध्ये ई-वाहनांचा वापरदेखील सुरू करण्यात आला आहे.

जेएनपीएने टाउनशिप, हॉस्पिटल, गेस्टहाऊस, बल्क ऑफिस एरिया, प्रशासन इमारत, मुख्य जेट्टी क्षेत्र, लँडिंग जेट्टी, आयसीडी ऑफिस, लिक्विड कार्गो जेट्टी, रस्ते आणि जवळपासच्या विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



**उरण : अखिल महाराष्ट्र कराडी समाजाचे अध्यक्ष कै. सुनील बाळकृष्ण कोटकर यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त कोटनाका येथे अभिवादन करण्यात आले. या वेळी आमदार महेश बालदी, भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, अखिल महाराष्ट्र कराडी समाज अध्यक्ष महादेव बंडा, भाजप उरण शहर युवा अध्यक्ष तथा कोटगाव अध्यक्ष निलेश पाटील, (जय हरी) कराडी समाज सेक्रेटरी विलास पाटील, नित्यानंद परशुराम भोईर आदी उपस्थित होते.**

# पनवेल परिसरात गावठी दारूचा साठा हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने दोन वेगळ्या ठिकाणी टाकलेल्या छाप्यात गावठी हात भट्टी दारूचा साथ हस्तगत केला आहे,

तालुक्यातील कातकरी वाडी चेरेवली येथील दोन वेगवेगळ्या ठिकाणी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद फडतरे, पोलीस उपनिरीक्षक गजानन टाकळे, पोहवा संतोष चिकणे आदींच्या पथकाने छापा टाकून एका ठिकाणाहून ७०० रुपये किमतीचा गावठी हात भट्टीचा दारूचा साठा हस्तगत केला आहे. याच पथकाने दुसऱ्या ठिकाणी छापा टाकून जवळपास एक हजार रुपये किमतीचा गावठी हात भट्टीचा साठा हस्तगत केला आहे. या दोन छाप्यामुळे बेकायदेशीर रित्या गावठी दारू विक्री करणाऱ्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

# रांगोळीतून साकारली एकविरा देवीची प्रतिकृती

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर कातलपाडा येथील कस्तुरी म्हात्रे हिने दीपावलीच्या सणानिमित्त रांगोळीतून आदिमाया आदिशक्ती एकविरा आईची सुंदर अशी प्रतिकृती साकारली असून, कस्तुरी म्हात्रे हिच्या कलेचा आविष्कार येथे प्रत्यक्ष पाहायला मिळत आहे.



रंगांची जादू आणि जीव ओतून रांगोळीत आणलेला जिवंतपणा एकूणच रांगोळीची भव्यता पाहताना प्रत्यक्ष अनुभव येतो. कस्तुरी म्हात्रे आणि तिच्या बहिणी स्वरा म्हात्रे व पूर्वा म्हात्रे यांनी या रांगोळीसाठी चार तास वेळ देत ही रांगोळी साकारली आहे. यासाठी त्यांनी एक किलो रांगोळीच्या रंगांचा वापर केला आहे. वास्तवाला भिडणारी ही आदिमाया आदिशक्ती एकविरा देवीची रांगोळी, रांगोळीच्या देखाव्यात एखाद्या शिल्पा प्रमाणेच भर घालत आहे. रांगोळीतून, अगदी हुबेहूब साकारलेली ही एकविरा देवीची रांगोळी कातलपाडा आळीतील नागरिकांचे आकर्षण ठरली असून, रस्त्यातून ये-जा करणारे नागरिकही पाच मिनिटे थांबून, रांगोळी पाहून थक्क होत आहेत.

सोशल मीडियाचा आधार घेत, या रांगोळीचे फोटो सध्या इंटरनेटवर व्हायरल झाले असून कस्तुरी म्हात्रे हिला याबद्दल अभिनंदनाच्या कमेन्ट्स येत आहेत. तर श्रद्धाळू भाविकांना देवीच्या मूळ स्थानावर येऊन दर्शन घेतल्याचा भास होत आहे. दरम्यान, कस्तुरी, स्वरा व पूर्वा यांचे चिरनेर परीसरातून कौतुक होत आहे.

# ऐरोलीत दिवाळी पहाट; रसिक मंत्रमुग्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या वतीने बाळासाहेबांची शिवसेना दिवाळीची पहिली पहाट-२०२२चे आयोजन श्रीमती मंगला नारायण रायकर चौक, यश पॅराडाईजजवळ ऐरोली सेक्टर-८ येथे करण्यात आले होते.

सुरेल गाण्यांच्या मैफिलिने रसिक मंत्रमुग्ध झाले. शिंदे गटाचे समर्थक, नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते आणि नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख विजय चौगुले व युवा सेना कार्यकारीचे महाराष्ट्र राज्य सदस्य मामित चौगुले यांच्या वतीने दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात आले होते.

पहाटेच्या भक्तिगीतांनी, मराठमोळ्या गाण्यांनी रंगलेल्या मनोरंजनात्मक कार्यक्रमाने आणि त्यानंतर झालेल्या तरुणाईच्या ढोलताशांच्या गजरावर ठेका धरत दिवाळी पहाट झाली.

या वेळी संवाद साधताना जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांनी, यंदा साऱ्यांनी निर्बंधमुक्त दिवाळी साजरी करावी, असे सांगत दिवाळी सणाच्या निमित्ताने नागरिकांनी एकत्र यावे, त्यांनी नव्या जुन्या आठवणींना उजाळा द्यावा, त्यातूनच दिवाळीचा खरा आनंद आपल्याला मिळेल असे सांगितले.



# वाशीत १२१ दिव्यांचा दीपोत्सव साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेश राय यांनी स्थानिक नागरिकांसह उत्कर्ष महिला सेवा समितीच्या वतीने वाशी नवी मुंबई केशव कुंज सोसायटीच्या मंदिरात १२१ मातीचे दिवे प्रज्वलित करत दीपोत्सव साजरा करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अयोध्येत दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर सतरा लाख दिवे प्रज्वलित करून विश्वविक्रम केला. त्याचबरोबर यावर्षी काश्मीरमध्येदेखील राज्यपाल, महामहिम मनोज सिन्हा यांनी दीपप्रज्वलन केले. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या लोकांना रोजगार मिळावा म्हणून हे सर्व मातीचे दिवे स्थानिक नागरिकांनीच बनवले आहेत. यातून प्रेरणा घेऊन हा उपक्रम करण्यात आला.

वाशीतील दीपोत्सव कार्यक्रमाला भारतीय आघाडीचे उपाध्यक्ष विजय सिंह, मंदिराचे पुजारी, रूपश्री पोहल, हर्षा गोलतकर यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# नवघरमध्ये सोनेरी सुरांनी रंगली दिवाळीसंध्या

**उरण : वार्ताहर**

नवघर येथे सोनेरी सुरांनी रंगली दिवाळी संध्या नवघर येथे स्वर रंग परिवार निर्मित संगीतमय मैफल दीपावली संध्या हा कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. या कार्यक्रमात शास्त्रीय गायन आणि उपशास्त्रीय गायन याची रेलचेल होती.



पंडित गणेश बंडा आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी अतिशय छान पद्धतीने आपले संगीत गायन वादन सादरीकरण केले. तसेच या कार्यक्रमांमध्ये ज्ञानदीप बंडा यांचे तबलासोलो वादन झाले. या कार्यक्रमाला कामगार नेते भूषण पाटील, महाराष्ट्राचे कीर्तनकार हभप प्रल्हाद महाराज वहाळकर महाराज आणि डॉ. विशाल गावंड ज्ञानेश्वर बुवा गव्हाण तसेच अनेक कीर्तनकार भजनीबुवा सामाजिक व राजकीय कार्यकर्ते व पत्रकार या कार्यक्रमाला उपस्थित होते.

गणेश बंडा यांनी नाट्यगीत आणि अभंग सादर केले. त्यानंतर गीता ठाकूर, वर्षा ठाकूर, आदिती मोकल यांचे गायन झाले. मध्यांतर ज्ञानदीप बंडा यांचे तबलावादन झाले. प्रथम कोळी, आदिती मोकल, गीता ठाकूर, ध्रुव म्हात्रे यांचे गायन सादर झाले धनश्री बंडा हिने विलंबित एकतालामध्ये राग मिया की तोडी राग सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. शेवटी त्यांनी एक नाट्यगीत सोहम डमरू आणि अवघा रंग एक झाला या भैरवीने सांगता केली कार्यक्रमाचे संपूर्ण निवेदन निशीधा कोळी यांनी केले.

# राजपुरीमध्ये कचऱ्याचे ढिगारे

## ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष, ग्रामस्थाची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यालगत सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. मात्र त्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार ग्रामस्थ जावेद अब्दुलकरीम हवालदार यांनी जिल्हाधिकारी, मुरुड तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



(छाया : संजय करडे)

राजपुरी गाव पर्यटनाच्या दृष्टिकोनातून प्रसिद्ध आहे. ग्रामपंचायतीला वित्त आयोगामधून लाखो रुपये प्राप्त होत असतात, तसेच ग्रामपंचायत करवसुलीही करीत असते, मात्र ग्रामपंचायतीकडे डम्पिंग ग्राउंडची व्यवस्था नाही, कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी नाही. त्यामुळे मोहल्ल्यातील ग्रामस्थ रस्त्यावरच कचरा टाकत आहेत. हा कचरा कुजून परिसरात दुर्गंधी पसरत असून, ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

राजपुरी ग्रामपंचायतीने सार्वजनिक ठिकाणी टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थित व्यवस्थापन केले नाही, तर त्या विरोधात न्यायालयात जाण्याचा इशारासुद्धा जावेद अब्दुलकरीम हवालदार यांनी या निवेदनात दिला आहे. याबाबत राजपुरीच्या सरपंच हिरकणी गिदि यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्या बाहेरगावी असल्याने संपर्क होऊ शकला नाही.

# खोपोली विश्रामगृहाच्या जागेत सुसज्ज गार्डन उभारा

## आरपीआय युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडीक यांचे बांधकाममंत्र्यांना साकडे

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली विश्रामगृह गेल्या १० वर्षापासून पडीक अवस्थेत असून, इमारतीची नासधूस झाली आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेली ही जागा हडप होण्याची भीती असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेल्या या विश्रामगृहाची जागा खोपोली नगर परिषदेस हस्तांतरीत करून तेथे सुसज्ज मोठे गार्डन उभारावे, अशी मागणी आरपीआयचे युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडीक यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



(छाया : अरुण नलावडे)

प्रमोद महाडीक यांनी नुकतीच ना. रवींद्र चव्हाण यांची डोंबिवली येथील कार्यालयात सोमवारी (दि. २४) भेट घेऊन त्यांना मागणीचे निवेदन दिले. आरपीआयचे जिल्हाध्यक्ष जगदीश गायकवाड, खोपोली शहर अध्यक्ष नितीन वाघमारे यावेळी उपस्थित होते.

मुंबई-पुणे महामार्ग तयार करताना ब्रिटीशांनी मुक्कामासाठी खोपोलीची निवड केली होती. त्यावेळी ब्रिटीश अधिकाऱ्यांना विश्रांतीसाठी खोपोलीत डाक बंगला तयार करण्यात आला होता. मुंबई-पुणे महामार्गाला लगत मोक्याच्या ठिकाणी अडीच एकर जागेत हे विश्रामगृह आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेल्या या विश्रामगृहाची सध्या अतिशय दूरवस्था झाली आहे. विश्रामगृहाची संरक्षक भिंत ढासळलेली आहे. विश्रामगृहाच्या लोखंडी प्रवेशद्वाराला मोठमोठे दगड लावून आधार देण्यात आला आहे. विश्रामगृहाचा परिसर पूर्णपणे पालापाचोळा आणि कचऱ्याने भरून गेला आहे.

याठिकाणी खानसामा, सुरक्षारक्षक नसल्याने रात्रीच्या वेळी इमारतीचा गैरवापर होत आहे. आज खोपोलीत जागेचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे मोक्याच्या ठिकाणी असलेली ही अडीच एकर जागा हडप होण्याची शक्यता आहे, असे महाडीक यांनी निवेदनात म्हटले आहे. खोपोली शहर आणि शिळफाटा उपशहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या विश्रामगृहाच्या जागेत सुसज्ज गार्डन उभारल्यास मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्याची सोय होईल, तसेच शहराच्या सौंदर्यातही भर पडेल. सुसज्ज गार्डन उभारण्यासाठी विश्रामगृहाची जागा सार्वजनिक बांधकाम विभागाने खोपोली नगर परिषदेस हस्तांतरीत करावी, असे प्रमोद महाडीक यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# पेणच्या भोगावती नदी घाटावर रंगली दिवाळी पहाट



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

समाज प्रबोधन मंच या संस्थेतर्फे सोमवारी (दि. २४) पेणच्या भोगावती नदी घाटावर दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी दत्तात्रेय मोकल (हनुमानपाडा), हभप नामदेवबुवा ढमढेरे (बेलवडे), हभप सुनील महाराज, हभप विश्वनाथबुवा पाटील, रवींद्र गणपत पाटील, मंगेश पाटील (बोरगाव) यांनी आपल्या गायनाने उपस्थित श्रोत्यांना भोगावती नदीचे महत्त्व पटवून मंत्रमुग्ध केले. त्यांना अभिषेक मोकल (तबला) आणि आकाश पाटील (मृदंग) यांची साथ लाभली.

सोमवारी पहाटे भोगावती नदीवर ७५ दिवे प्रज्वलीत करून या दिवाळी पहाट कार्यक्रमाला सुरुवात झाली. भोगावती नदीच्या आरतीने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रायगड विभाग संघचालक यशवंतराव पाटील व रसिक श्रोते उपस्थित होते.

वृक्षमित्र प्रा. उदय मनकावळे, मंचाचे अध्यक्ष अनंत पाटील, कार्याध्यक्ष रुपेश कदम, सचिव मनोज पाटील, मार्गदर्शक एच. एम. पाटील, रवींद्र ग. पाटील यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## खोपोली बायपासजवळ ट्रकची कठड्याला धडक; चालक गंभीर

**खालापूर : प्रतिनिधी**

चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने द्रुतगती मार्गावरून चाललेल्या ट्रक (आरजे ०१ जीबी ०२१९) ने मंगळवारी (दि. २५) सकाळी खोपोली बायपासजवळ रस्ता दुभाजक कठड्याला धडक दिली. या अपघातात ट्रकचालक गंभीर जखमी झाला असून, त्याला कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून मंगळवारी सकाळी ट्रक पुण्याकडून ते मुंबई बाजूकडे जात होता. बोरघाटातील खोपोली बायपासजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने सदर ट्रक दोन्ही लेनमध्ये असलेल्या रस्ता दुभाजक कठड्ड्याला धडक दिली. या अपघातात ट्रक चालकाच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली. त्याला आयआरबी रुग्णवाहिकेच्या मदतीने एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या घटनेने द्रुतगती मार्गावरील वाहतूक काहीकाळ बाधीत झाली होती. आयआरबीच्या क्रेनने अपघातग्रस्त ट्रक रस्त्याच्या बाजूला घेतल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. पुढील तपास महामार्ग पोलीस केंद्राचे सहाय्यक निरीक्षक योगेश भोसले करीत आहेत.

# कर्जत रोटरी क्लबचा दिवाळी सण आदिवासी आणि निराधारांसोबत



**कर्जत : प्रतिनिधी**

समाजातील गरीब कुटुंबे, निराधार मुले, व्यक्ती या दिवाळी सणाच्या आनंदापासून दूर असतात. त्या सर्वांना दिवाळी सणाचा आनंद घेता यावा, त्यांची दिवाळी गोड व्हावी या उद्देशाने रोटरी क्लब कर्जत या संस्थेच्या वतीने आदिवासीवाड्यांमध्ये जाऊन गरीब तसेच निराधार लोकांमध्ये दिवाळी साजरी करण्यात आली.

कर्जत रोटरी क्लबच्या पदाधिकारी व सदस्यांनी तालुक्यातील हालिवली, किरवली, सावरगाव येथील आणि इतर आदिवासीवाड्यांमध्ये जाऊन तेथील सर्व कुटुंबांना दिवाळीचा फराळ, लाडू, महिलांसाठी साड्या, सुगंधी उटणे, मुलांना फुलबाजे यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर कर्जत शहरातील रिमांडहोम, शासकीय महिला वसतिगृह, नेरळ येथील मुलींचे आसरा सुरक्षा शेल्टर येथील निराधार मुले, महिला व मुली यांनाही मिठाई वाटप करण्यात आली.

क्लबचे अध्यक्ष श्रीखंडे, सचिव विशाल शाह, जितेंद्र ओसवाल, योगेश राठी, हुसेन जमाली, अरविंद जैन, डॉ. आदित्य जंगम, सुजित भोईर आदी सदस्यांसह आदिवासी ग्रामस्थ सुनील पवार, अनंत सांबरी यांचा या उपक्रमात सहभाग होता. या वेळी निवासी नायब तहसीलदार विजय राऊत, नायब तहसीलदार सोपान बचाकर उपस्थित होते.

# डिकसळ येथील पेशवेकालीन विहिरीवर दीपोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील डिकसळ येथील पेशवेकालीन विहिरीवर २७६ दिप लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी किशोर गायकवाड यांच्या हस्ते विहिरीची पूजा करण्यात आली.

डिकसळ येथे पेशवेकालीन विहीर असून मागील दोन वर्षांपूर्वी या विहिरींची स्वच्छता करण्यात आली होती. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेल्या या या विहिरींचे पावित्र्य राखण्यासाठी पूजन करण्याचा संकल्प आणि उपक्रम समाधान पाटील आणि रवी जाधव यांनी सुरु केला आहे. गावातील तरुण दिवाळी सणामधील अमावस्येच्या दिवशी विहिरीची पूजा आणि दीपोत्सवाचे आयोजन करतात.



या विहिरीवर २७६ दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला. प्रकाश पाटील, समाधान पाटील, श्यामकांत पाटील, उमरोली ग्रामपंचायत सदस्य तेजस भासे, ॲड. उत्तम गायकवाड, अमर पाटील, विनायक पाटील, उमेश शेळके, पंढरीनाथ ठाकरे, गिरीश पाटील यांच्यासह ग्रामस्थ या दीपोत्सवात सहभागी झाले होते.

## मायेची सावली

रणरणत्या उन्हात मायेची सावली देणारी
अंधारलेल्या वाटेवरचा दिवा होणारी

मी न बोलता ही मनाचे बोल ओळखणारी
आयुष्याच्या प्रत्येक वाटचालीत कायम साथ देणारी

एखाद्या मायसारखं आम्हा सर्वांना जपणारी
मी चुकत असेन तर माझा कान धरून मला सरळ करणारी

कमाल गप्पा मारणारी
सगळ्यांसोबत धम्माल मज्जा मस्ती करणारी

ज्ञानाची ज्योत बनून दिशा दाखवणारी आणि एखाद्या
फुलालाही लाजवेल इतकी गोड हसणारी.. ताई

त्या देवाची कृपा प्रत्येक भावा-बहिणीच्या
नात्यात कायम असावी...

गाऱ्हाणं माझं त्या देवाकडे इतकंच.. की प्रत्येक भावाला
तुझ्यासारखी छान एकतरी बहीण त्याने द्यावी!

**-सिद्धेश राजेश बने**

## भास तुझा

सांजवेळी ये आकाशी
पहावे तुला मन भरूनी

वारा हा अल्लड होऊनी
छळतो बघ मज कसा

स्पर्श होता गालावरी त्याचा
वाटे हा तर भास तुझा

स्पर्श आणि भासाचे
हे बोलणे कधी कळलेच नसावे तुला...!

**-नंदिता शेवाळकर-जंगम, पनवेल**

## बियाणे जरासे

रूजत घातले मी बियाणे जरासे
ढगा! सोड ना रे बहाणे जरासे

भिजू पावसाने अता चिंब दोघे
पुन्हा आज होऊ दिवाणे जरासे

नको मानवा दोष देऊ कुणाला
तुझे तूच व्हावे शहाणे जरासे

नको धर्म जाती विचारू कुणाला
जरी उच्च असले घराणे जरासे

पुन्हा आडवी कर तुझी वाट सखये
पुन्हा तेच उधळू तराणे जरासे



**-प्रभाकर सुधाकर पवार**
**पवाळे, ता. मुरबाड**




बोनस शब्द ऐकला की सर्वांनाच आनंद होतो. बोनस म्हणजे आपणाला काही तरी अतिरिक्त मिळणार हे अपेक्षित धरून आपण सर्वजण आनंदित होतो.

दिवाळी-दसरा सण आला की बोनस मिळणार ही सर्वसाधारण कर्मचारी वर्गाला अपेक्षा असते. त्यामुळे कर्मचारीवर्गामध्ये आनंदाचे वातावरण असते. कर्मचारीवर्गाच्या कुटुंबातील सदस्यसुद्धा आनंदित असतात. बोनस म्हणजे पगाराव्यतिरिक्त मिळणारे मानधन होय. या बोनसची आपण सर्वजण वर्षभर मोठ्या आतुरतेने वाट बघत असतो.

काही कंपन्या आपल्या मिळविलेल्या लाभातून आपल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व आपले उत्पादन वाढविण्यासाठी बोनस देत असतात. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये एक सकारात्मक संदेश जाऊन ते अधिक जोमाने काम करण्यास प्रवृत्त होतात. खासगी, सरकारी, निमसरकारी किंवा अन्य कोणत्याही कर्मचाऱ्यांनो या दिवाळीत जो बोनस आपल्या खात्यात जमा झाला त्या बोनसवर, दिवाळी सणात साजऱ्या होणाऱ्या हरेक आनंदावर, गोडधोडावर एकच सही आहे ती म्हणजे भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकरांची. बोनस बिल पारित करून घेऊन व त्यांची अंमलबजावणी करून या देशातील तमाम कामगारवर्गाची दिवाळी गोड करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी एक सलाम तर प्रत्येकानेच करायला हवा.

बरे असो हे झालं आर्थिक लाभाबाबत. आपल्या जीवन बोनसच काय? आपण क्रिकेटची कॉमेंटरी



ऐकताना आपल्या कानावर बऱ्याच वेळा ऐकायला मिळत. कोरोना महामारीने हाहाकार केला होता. कोरोना नावाचा बॉलर खूपच फार्मात होता. तो एका दिवसात लाखो बळी घेत होता. त्याने मानवाला सळो की पळो करून सोडले होते. मानव हा हतबल झाला होता. तो मेटाकुटीस आला होता. तो दहशत व दडपणाखाली जीवन जगात होता. अगदी दुसऱ्या दिवशी सकाळी अंथरुणावरून उठल्यावर स्वतःला धन्य समजायचा आणि परमेश्वराचे आभार मानायचा व मनोमनी म्हणायचा वाचलो रे बाबा मी एकदाचा. कोरोना कधी कोणाची विकेट काढेल याचा नेम नसायचा.

कोरोनाच्या काळात मानव एकदमच विसरलेली माणुसकी अंगिकारित होता. एकमेकाला मदत करायचा. कोरोनाने मानवाचा अहंकार, इगो जागेवर आणला होता. अगदी तो घुटण्यावर आला होता. सर्वांसोबत अगदी आपलेपणाने वागत होता. त्याचा मदतीचा भाव जागा झाला होता व तो मनोमनी संकल्प करीत होता की माझे हे जीवन मी दुसऱ्यासाठी सार्थ करेन. आता मी कपटीपणा करणार नाही, निंदा नालस्ती करणार नाही वगैरे वगैरे. चांगुलपणाचा आव आणत होता. जसा कोरोना संपला तसा तो आपल्या मूळ स्वभावावर आला. परत एकदा त्याचे कपट-कारस्थाने सुरू झालीत. निंदानालस्ती सुरू झाली. मानवच मानवाला संपवायला निघाला. त्यात आता परत एकदा अहंपणा निर्माण झाला.

मानवा, तू एवढ्या मोठ्या महासंकटातून वाचलास, तुला निसर्गाने जीवन बोनस दिला. या बोनस जीवनाचे तुझ्या व इतरांच्या जीवनात काही तरी चांगले कर! कुणाच्या मदतीला धाव. उगाच आपल्या हट्टापायी दुसऱ्याचे नुकसान करू नकोस.

हे जीवन आपण सर्वांचे बोनस आहे. आपण सर्वजण मानव कल्याणाचा संकल्प करूया व या मिळालेल्या जीवदानाचा लाभ घेत आपल्या जीवनाची तर सेन्चुरी पूर्ण करूया व सोबतच इतरांची सेन्चुरी पूर्ण होईल. त्यासाठी मदत करूया.

सध्या दिवाळीचा उत्सव सुरू आहे व सगळीकडे उत्साहाचे वातावरण आहे. बाजारपेठा फुललेल्या आहेत, तर चला एक दिवा माणुसकीचा, ऐक्याचा, ज्ञानाचा, राष्ट्रप्रेमाचा, पर्यावरणाचा, परिवर्तनाचा, यशाचा व संस्काराचा लावूया व आपणास जीवन बोनस मिळालेल्या लाभाचा फायदा मानव कल्याण्यासाठी करूया! नाहीतर सर्वांना बोनस मिळूनसुद्धा आपल्याला लाभ घेता आला नाही अशी मानवावर वेळ येणार नाही अशी अपेक्षा करूया. दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

**-अरविंद मोरे, नवीन पनवेल**

# फ्री हिट चेंडूवर अंपायरचा निर्णय पूर्णपणे योग्य

## पाकला माजी पंच सायमन टॉफेल यांनी सुनावले



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी२० विश्वचषकाच्या सुपर-१२ सामन्यात भारताने पाकिस्तानचा चार गडी राखून पराभव केला. या सामन्यात विराट कोहलीने ५३ चेंडूत ८२ धावांची शानदार खेळी खेळली. या खेळीत त्याने सहा चौकार आणि चार षटकार मारले. शेवटच्या चेंडूपर्यंत खेळल्या गेलेल्या या रोमांचक सामन्यात अनेक रंजक घटना घडल्या. या सामन्यातही अशा काही घटना घडल्या ज्यामुळे वाद निर्माण झाला होता. चेंडू टाकल्यानंतर फलंदाज फ्री हिटवर त्रिफळाचीत झाला तर धाव घेऊ शकतो का? यावर ऑस्ट्रेलियाचे माजी पंच सायमन टॉफेल यांनी या संपूर्ण प्रकरणावर भाष्य केले आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात विराट कोहली पाकिस्तानी फिरकी गोलंदाज मोहम्मद नवाजच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला, मात्र यादरम्यान भारतीय फलंदाजांनी बाईजच्या स्वरुपात पळून तीन धावा काढल्या. यावर पाकिस्तानी माध्यमे आणि पाकिस्तानचे दिग्गज माजी क्रिकेटपटू यांनी यावर उलट-सुलट प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्या चेंडूला डेड बॉल म्हणायला हवे, पण आता ऑस्ट्रेलियाचे माजी पंच सायमन टॉफेल यांनी या संपूर्ण प्रकरणावर भाष्य केले आहे.

सायमन टॉफेल यांच्या मते, पंचांनी बाय म्हणून तीन धावा दिल्या, हा पंचाचा योग्य निर्णय होता. फ्री हिटच्या चेंडूवर विराट कोहली बाद झाला, पण चेंडू थर्ड मॅनच्या दिशेने गेला, त्यानंतर दोन्ही फलंदाजांनी पळ काढत ५० धावा पूर्ण केल्या. सायमन टॉफेल पुढे म्हणाले की, या चेंडूवर अंपायरचा निर्णय पूर्णपणे योग्य होता. सायमन टॉफेलच्या मते फ्री हिटवर जे काही घडले त्यात काहीही चुकीचे नव्हते.

सायमन टॉफेल पुढे म्हणतात, वास्तविक भारतीय फलंदाज विराट कोहलीला पाकिस्तानी गोलंदाज मोहम्मद नवाजने बाद केले, पण दोन्ही फलंदाजांनी पळ काढला आणि तीन धावा पूर्ण केल्या. सायमन टॉफेल म्हणाले की, या संपूर्ण वादानंतर अनेकांनी त्यांना मेसेज केले. यासोबतच लोकांना मेसेज करून संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर खुलासा करण्यास सांगितले. या कारणास्तव त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपूर्ण प्रकरण बारकाईने सविस्तर सांगण्याचा प्रयत्न केला.

### नियम काय सांगतो...

१. नियमानुसार एखाद्या चेंडूची क्रिया चेंडू यष्टीरक्षकाच्या हाती गेल्यावर किंवा चौकार, षटकाराची खूण केल्यानंतर पूर्ण होते, तसेच फलंदाज बाद झाल्यावरही चेंडूची क्रिया पूर्ण होत असते.

२. वरील नियमानंतर चेंडूची क्रिया पूर्ण झाल्याचे पंच जाहीर करू शकतात. चेंडू यष्टींवर लागला तर त्यावेळी एक किंवा दुसरी बेलही पडली तर पंच डेड बॉल झाल्याचे सांगू शकतात.

# रेवदंड्यातील कुस्ती स्पर्धेत आंदोशी आखाडा प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**



श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळ चौल-रेवदंडा आयोजित कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ सोमवारी (दि. २४) उत्साहात झाला. स्पर्धेत आंदोशी आखाडा यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर वाडगाव द्वितीय व मांडवाने तृतीय क्रमांक पटकावला. रंगतदार कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी मोठी गर्दी कुस्ती प्रेमी मंडळीने केली होती.

प्रतिवर्षी लक्ष्मीपुजनाचे निमित्ताने रेवदंडा हायस्कूलच्या पटागंणात पारंपरिक कुस्ती स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळ चौल-रेवदंडाचे वतीने करण्यात येते. या कुस्ती स्पर्धेत जिल्हातील नामवंत खेळाडूंनी यापूर्वी सहभाग नोंदविला असल्याने या पारंपरिक कुस्ती स्पर्धेचा संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक आहे.

स्पर्धेचा शुभारंभ अलिबाग तालुका कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष जयेंद्र भगत यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला, तत्पूर्वी हनुमान प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून व श्रीफळ वाढवून पुजाअर्चा करण्यात आली.

या वेळी संदिप घरत यांची प्रमुख उपस्थिती होती, तसेच श्री छत्रपती शिवाजी मंडळ चौल-रेवदंडा अध्यक्ष सुरेश खोत, खजिनदार शरद वरसोलकर, चिटणीस हेमंत गणपत, सदस्य मधुकर फुंडे, महेश ठाकूर, सुभाष शेळके, आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेचे सुत्रसंचलनाची जबाबदारी राजेंद्र नाईक यांचेवर सोपविण्यात आली. पंचाचे काम वासूदेव पाटील आंदोशी, रविंद्र घासे नवगाव, प्रमोद भगत आवास, सुधाकर पाटील आंदोशी, व वैभव मुकादम बेलोशी यांनी पाहिले.

## फ्रेंच खुली बॅडमिंटन स्पर्धेत

# लक्ष्यसमोर श्रीकांतचे आव्हान



**पॅरिस : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विजेता लक्ष्य सेनचा मंगळवारी फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत किदाम्बी श्रीकांतशी सामना होणार आहे. सेन आणि श्रीकांत जागतिक क्रमवारीत अनुक्रमे आठव्या व ११व्या स्थानी आहे. दोघेही कारकीर्दीत दुसऱ्यांदा एकमेकांसमोर असणार आहेत.

सेनने नुकत्याच पार पडलेल्या डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या कोडाइ नाराओकाकडून हार पत्करली. त्यापूर्वी, श्रीकांतने २०२१ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सेनला पराभूत केले होते. या स्पर्धेत त्याने रौप्य कामगिरी केली. या लढतीतील विजेत्या खेळाडूचा सामना जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या डेन्मार्कच्या अँडर्स अँटोनसेनशी होऊ शकतो.

एच. एस. प्रणॉयचा सामना पहिल्या फेरीत मलेशियाच्या डॅरेन लिवशी होणार आहे. या सामन्यात विजय मिळवल्यास प्रणॉयसमोर पाचवा मानांकित केंटो मोमोटा आणि चौथा मानांकित चोउ टिएन चेनशी होऊ शकते. ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती सायना नेहवाल पहिल्या फेरीत जर्मनीच्या वोन्ने लि विरुद्ध खेळेल. सात्विकसाइराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टीचा सामना पुरुष दुहेरीत जपानच्या ताकुरो होकी आणि युओ कोबायाशीशी होणार आहे.

# राज्य बेंच प्रेस स्पर्धेत अक्षय शनमुगम स्ट्राँगमन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टींग असोसिएशनच्या वतीने २१ ते २३ ऑक्टोबर दरम्यान इंदापूर (पुणे) येथे बेंच प्रेस स्पर्धा सब ज्युनिअर, ज्युनिअर, सीनिअर, मास्टर अशा विविध गटाच्या ई क्लिप आणि अनई क्लिप स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत सीनिअर ७४ किलो वजनी गटात रायगडच्या अक्षय शनमुगमयाने सुवर्ण पदक प्राप्त करून सीनिअर स्ट्राँगमन २०२२ हा किताब प्राप्त केला.

या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी एकूण आठ पदके प्राप्त केली आहेत, तसेच ज्युनिअर स्पर्धेत उपविजतेपद प्राप्त केले आहे.

कुणाल पिंगळे ज्युनिअर ५३ किलो गट सुवर्ण, दिनेश पवार मास्टर ७४ किलो गट सुवर्ण, अक्षय शनमुगम सीनिअर ७४ किलो गट सुवर्ण, सनत क्षिरसागर ज्युनिअर ५९ किलो वजनी गट कांस्य, ऋतिक पोळ ज्युनिअर १२० किलो वजनी गट रौप्य, शुभम कांगले १२० किलो वजनी गट सीनिअर ब्राँझ, सुहानी गावडे ४३ किलो सबज्युनिअर मुली रौप्य, संतोष गावडे ५९ किलो वजनी गट मास्टर सुवर्ण पदक पटकावले. सर्व खेळाडूंचे रायगड पॉवरलिफ्टिंगचे अध्यक्ष गिरीश वेदक, सेक्रेटरी अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, संदीप पाटकर, राहुल गजरमल, यशवंत मोकल, राज्य संघटनेचे सेक्रेटरी संजय सरदेसाई यांनी अभिनंदन केले आहे.

# आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांत कोहली सहावा

**मेलबर्न : वृत्तसंस्था**



टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध सामना जिंकून देणारी खेळी करताना विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावांच्या आघाडीवर सध्याचा प्रशिक्षक राहुल द्रविडला मागे टाकले. सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांत कोहली आता सहाव्या क्रमांकावर आला आहे. कोहलीच्या नावावर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २४,२१२ धावा असून, यात ७१ शतके आणि १२६ अर्धशतकांचा समावेश आहे. द्रविडच्या नावावर २४,२०८ धावा आहेत. यामध्ये ४८ शतके आणि १४६ अर्धशतकांचा समावेश आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघ चार बाद ३१ असा अडचणीत असताना कोहलीने कमालीच्या धीरोदात्तपणे फलंदाजी करून भारताचा विजय साकार झाला. या संपूर्ण खेळीत कोहलीने दाखवलेला संयम, आक्रमकता आणि अखेरच्या षटकात बाईज धावा काढताना दाखवलेली समयसूचकता त्याचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारी होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांत सचिन तेंडुलकर (३४,३५७ धावा) आघाडीवर असून, त्यानंतर कुमार संगकारा (२८,०१६), रिकी पॉन्टिंग (२७,४८३), महेला जयवर्धने(२५,९५७) आणि जॅक कॅलिस (२५,५३४) यांचा क्रमांक येतो.

**भारताने मोडला ऑस्ट्रेलियाचा विक्रम**

या विजयाने भारतीय संघाने कॅलेंडर वर्षांत सर्वाधिक विजय मिळविण्याचा ऑस्ट्रेलियाचाही विक्रम मोडीत काढला. ऑस्ट्रेलियाने २००३ मध्ये ४७ सामन्यांत ३८ विजय मिळविले होते. भारताने या वर्षी ५६ सामन्यांत ३९ विजय मिळविले आहेत.

# सेमी फायनलबाबत गांगुलीची भविष्यवाणी



**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० वर्ल्डकपच्या पहिल्या सामन्यात टीम इंडियाचा पाकिस्तानविरुद्ध शेवटच्या बॉलवर थरारक विजय झाला आहे. विराट कोहली भारताच्या या विजयाचा शिल्पकार ठरला. भारताचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचा माजी अध्यक्ष सौरव गांगुलीने या टी-२० वर्ल्डकपमध्ये सेमी फायनलला पोहोचणाऱ्या चार टीमबाबत भविष्यवाणी केली आहे.

आपण भूतकाळात काय घडले, हे पाहण्यापेक्षा वर्तमानात काय सुरू आहे, त्यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे, असे सौरव गांगुली इंडिया टुडेसोबत बोलताना म्हणाला. भारत स्पर्धा जिंकू शकणाऱ्या प्रबळ दावेदारांपैकी एक असेल. जिंकेल कोण हे सांगणे कठीण आहे, पण आपली टीम मजबूत आहे, टीममध्ये मोठे हिटर आहेत. टी-२० क्रिकेटमध्ये फॉर्ममध्ये असणं महत्त्वाचं आहे, अशी प्रतिक्रिया गांगुलीने दिली. भारत, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड सेमी फायनलला खेळतील, असे मला वाटतं. दक्षिण आफ्रिकेकडे चांगली बॉलिंग आहे. ऑस्ट्रेलियामधली परिस्थिती त्यांना मदत करेल, अशी भविष्यवाणी गांगुलीने केली.






## कै. विठ्ठल चाहु केणी मैदानाच्या नामफलकाचे अनावरण

# चार गावांना मिळाले हक्काचे खेळाचे मैदान

**पनवेल : वार्ताहर**



चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा या गावांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी स्थलांतर करण्यात आले. या गावांना हक्काचे मैदान मिळावे यासाठी ग्रामस्थांचा सातत्याने सिडकोकडे पाठपुरावा सुरू होता, मात्र सिडकोने चिंचपाडा विठ्ठलवाडी समोरील मैदान देण्यात आले आहे. या मैदानाला चिंचपाडा गावाचे सामाजिक कार्यकर्ते कै. विठ्ठल चाहु केणी यांचे नाव देत या नावाच्या नामफलकाचे अनावरण मंगळवारी (दि. २५) ज्येष्ठ माजी क्रिकेट खेळाडू सुरेश महादेव केणी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी चिंचपाडा ग्रामस्थ व तरुणे उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प पनवेल तालुक्यातील १० गावांतील जमिनींचे संपादन करून विकसित करण्यात येत आहे. त्याचबरोबर चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा या प्रकल्पबाधित गावांतील ग्रामस्थांचे स्थलांतर येथील पुनर्वसन आणि पुनर्स्थापना क्षेत्रात करण्यात आले आहे. आता पुनर्वसन झाल्यानंतर खेळ खेळण्यासाठी मैदानाची उणिवा तरुणांना भासत होती. येथील ग्रामस्थांनी सिडकोकडे आम्हाला खेळण्यासाठी मैदानाची आवश्यकता असल्याने लवकरात लवकर मैदान मिळावे यासाठी येथील ग्रामस्थांनी सिडकोकडे पाठपुरावा सुरू होता. अखेर चिंचपाडा विठ्ठलवाडीसमोर सिडकोने खेळाचे मैदान आरक्षित केले. त्यानुसार त्या मैदानाचे कामही प्रगतीपथावर आहे.

चिंचपाडा ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन गावातील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे कै. विठ्ठल चाहु केणी यांचे नाव देण्यात आले. या वेळी चिंचपाडा गावातील ज्येष्ठ नागरिक, माजी खेळाडू, युवा खेळाडू त्याचबरोबर ग्रामस्थ उपस्थित होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com